नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

सप्टेंबर १९५४
किंमत आठ आणे

संपादक
पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

माडखोलकर दप्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष ९ वें] सप्टेंबर १९५४ [अंक ६ वा

संपादक–मंडळ

ग. त्र्यं. माडखोलकर
के. ज. पुरोहित
पां. ब. गाडगीळ
सौ. कुसुमावती देशपांडे
गो. रा. दोडके
ना. रा. शेंडे

या अंकांत

भारतीय संस्कृतीची बदनामी —संपादकीय
वदतो व्याघात युग —मा. ज. कानेटकर
सांस्कृतिक आघाडीवर सामसूम (१) —राजशेखर
आपल्याला अस्तित्व आहे कां ? —पु. य. देशपांडे
मराठी नाट्यसृष्टींतील अनुभव :४: समारोप —वा. वा. भोळे
अमेरिकन गृहिणी —सौ. उमाबाई गोखले
वाङ्मयीन स्फुटें (स्वरूप व कार्य) —भ. प्र. मोहरील
कविता– बाबा मोहोड, वसंत निनांवे, उ. रा. गिरी, गणेश पाठक, सुरेश इनामदार, मधुकर उगले, रियासतकार
गो. स. सरदेसाई यांचें पत्र.
संघवार्ता.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यिकांचा पत्रव्यवहार

[सुप्रसिद्ध रियासतकार रा. ब. डॉक्टर गो. स. सरदेसाई यांनी, 'मध्यप्रदेश संशोधन मंडळा'चे चिटणीस श्री. दे. गो. लांडगे यांना, मंडळाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' व 'संशोधन मुक्तावलि : सर पहिला'या दोन ग्रंथांविषयी,आपला अभिप्राय व्यक्त केला आहे तो वाचकांस उद्‌बोधक वाटेल.]

स्वा. न. वि. वि. आपलें ता. ८ चें पत्र व संशोधन मंडळाचीं पुस्तकें पोंचलीं. आज सर्व वाचून संपविलीं. सांस्कृतिक इतिहासांत आपण थोडक्यांत गतकालाचा उत्कृष्ट आढावा घेतला आहे. यापेक्षा जास्त विस्तृत विवेचन पाहिजे असें मला वाटतें. प्रा. मिराशी यांचे लेख मी थोडे बहुत पूर्वीं वाचले होते. पण आजच्या या लेखांनीं त्यांच्या अगाध ज्ञानाचा व खोंचदार संशोधनाचा मला फार फार आदर वाटतो. खरें संशोधन कसें असावें, अभ्यासूंनी त्या कामांत प्रवेश व श्रम कसे करावे, आणि आपले निर्णय कोणत्या पद्धतीने वाचकांपुढे मांडावे याचे उत्कृष्ट मासले त्यांनी हिंदी जनतेला या लेखांच्या द्वारें कायमचे पुरविले आहेत. वाङ्मयांतून संशोधन कसें वेंचून काढावें याचा एक मोठा प्रबंधच त्यांनी वाचकांपुढे मांडला आहे. नवीन शास्त्रच निर्माण केलें आहे. काव्यें, नाटकें, शिलालेख, मूर्ती, स्थापत्य, नाणीं अशा विविध विषयांचें मंथन इतक्या मार्मिकतेने दाखविलेलें मला फारसें माहीत नाही. सर्वच लेख मी मोठ्या उत्कंठतेने वाचले. कालप्रियनाथाचा समग्र उल्लेख मला पूर्वी माहीत होता; परंतु तें स्थान काल्पी होय, किंबहुना काल्पी हें ठिकाण 'कालप्रिय' शब्दाचा अपभ्रंश होय, हा शोध मला अपूर्व बुद्धीचा वाटतो. या सर्व सिद्धांतांच्या मागे प्रत्यक्ष अवलोकन, अगाध वाचन, अहोरात्र विचार यांची जुळणी प्रा. मिराशी यांचे ठिकाणीं जमलेली पाहून मोठी धन्यता वाटली. सर्व पुस्तक अभ्यासकांना चिरंतन मार्गदर्शन करील यांत संशय नाही. मध्यप्रदेश सरकारने आर्थिक मदत करून हें पुस्तक बाहेर आणण्यांत बहुमोल राष्ट्रीय कामगिरी केली आहे. तुम्ही मला पुस्तकें पाठविलींत म्हणून मला हा अलभ्य लाभ घडला. कारण वयोमानाने मी आता उत्तरपंथांत आहे. एक महिन्यापूर्वी ९० वें वर्ष लागलें. त्याच दिवशीं कांही प्रेमी लोकांनी अभिनन्दनार्थ उपहारास बोलाविलें. जातांना पायीं गेलों. तेथें एकदम सर्वांगास कंप सुटून शक्तिपात झाला. मोटारींत घालून चौघांनी घरीं आणलें. पंधरा दिवस चिंतेंत गेले. आता अलीकडे पुनः बरें वाटत आहे ! आपल्या पुस्तकांच्या वाचनाने मला आराम वाटला.

भवभूतीचें पद्मपुर, चिनाब म्हणजे चंद्रभागा, सेतुबंध, गाथासप्तशती, प्रवरनगर म्हणजे पवनार, त्रिपुरी म्हणजे तेवर, सुप्रतिष्ठ म्हणजे पोथरा (हिंगणघाट) हे सर्व शोध प्राचीन इतिहासांत बहुमोल होत. गुणाढ्य, सोमदेव, क्षेमेन्द्र यांच्या ग्रंथांत किती तरी नवीन संशोधनास क्षेत्र आहे. किंबहुना महाराष्ट्री वगैरे प्राकृत भाषांतील प्रचंड वाङ्मयाचा, जैन ग्रंथांचा, बौद्ध वाङ्मयाचा अभ्यास करण्यास अद्यापि केवढें प्रचंड क्षेत्र आहे याचा अंदाज या संशोधनमुक्तावलीवरून होतो. प्रो. मिराशी यांस माझे धन्यवाद कळवावे.

त्याजबरोबर त्यांस एक विनंतीही करतों. प्रा. शेंबवणेकर यांचें पुस्तक The Glamour about the Guptas प्रा. मिराशी यांनी वाचलें आहे. त्यांत शेंबवणेकरांनी कालिदासाच्या विक्रमादित्याचा व विक्रम संवताचा संबंध महेन्द्रादित्य परमार व त्याचा पुत्र विक्रमादित्य याच्याशीं जोडला आहे. त्यास कथासरित्सागर विक्रमोर्वशीय इत्यादींचे आधार दिले आहेत. कालिदासाचा काल ते संवत्‌च्या सुरवातीस पोचवितात. या महत्त्वाच्या विषयावर प्रा. मिराशी यांचें मत प्रसिद्ध झालेलें नाही. हें त्यांस संमत आहे की नाही आणि त्याबद्दल त्यांस काय वाटतें तें सहजी कळविल्यास मला संतोष वाटेल. शेंबवणेकरांचें प्रतिपादन मला सयुक्तिक वाटतें. पण त्यास दुसरी बाजू असेल तर ती कळण्याची जिज्ञासा आहे.

पुनः पुस्तकें पाठविल्याबद्दल आभार मानून पत्र पुरें करतों. अशा अध्ययनांत वेळ गेला म्हणजे तो कारणीं लागला असें वाटतें. असाच लोभ निरंतर असों द्यावा ही विनंती.

पो. कामशेत
जि. पुणें, १७–६–५४

गो. स. सरदेसाई.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी वर्ष ९ सप्टेंबर १९५४ अंक ६ वा

संपादकीय

भारतीय संस्कृतीची वदनाम!

'एन्काउन्टर' या नावाच्या, साहित्य व राजकारण यांस वाहिलेल्या आणि सुविख्यात आंग्ल कवि स्टीफन स्पेंडर व इर्व्हिंग क्रिस्टल यांच्या संपादकत्वाखाली नव्यानेंच सुरु झालेल्या मासिकांत श्रीमती एस्. राजी यांचा एक मननीय लेख प्रकाशित झाला आहे. श्रीमती राजी ह्या तामिळ साहित्यांतील एक नामवंत लेखिका आहेत. या लेखांत श्रीमती राजी यांनी प्रादेशिक भाषांतील नामवंत लेखक आणि साहित्य यांच्यावावत आपलेच देशवांधव किती अनभिज्ञ असतात, एवढेच नव्हे, तर पाश्चात्य वाङ्मयावावतचें आपलें प्रेम पाश्चात्य लेखक व पत्रकार यांच्या समोर प्रदर्शित करण्याच्या भरांत प्रादेशिक भाषांतील भारतीय लेखक व साहित्य यांना क्रूर अन्याय करून पाश्चात्य वाङ्मयाच्या प्रतिकृतींच्या शिवाय प्रादेशिक भारतीय साहित्यांत नाव घेण्यासारखें जणुं दुसरें कांहीच नाही, असा वेजवाबदार प्रचार कसा करतात, याचें सुंदर चित्र रेखाटलें आहे.

आमच्या देशांत पाश्चात्य आणि विशेषत: आंग्लभाषेंत प्रकाशित होणाऱ्या साहित्याच्या भगतगणांचा एक बराच मोठा वर्ग आहे. या वर्गांतील लोक तथाकथित विद्वत्ता, अधिकाराच्या जागा व प्रतिष्ठा ब्रिटिश राजवटीच्या काळापासून बळकावून बसलें आहेत. भारत स्वतंत्र झाल्यापासून भारतीय साहित्य, कला व तत्वज्ञान यांच्यावावत साऱ्या जगभर एक नवें कुतूहल निर्माण झालें आहे. त्यामुळे अनेक देशांतील नामवंत साहित्यिक, कलाकार, लेखक व तत्वज्ञ भारतांत अलीकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणांत येऊं लागले आहेत. परंतु दुर्दैवानें हे परदेशीय प्रवासी भारतीय किनाऱ्यावर उतरल्या क्षणापासून इंग्रजी बोलीवर पोषाखी प्रभुत्व असलेल्या, पाश्चात्य साहित्याच्या बाटग्या भगतगणांच्या वर्गांतील कांही लोकांच्या तावडींत सापडतात. आणि त्यांच्या तोंडून प्रादेशिक भारतीय साहित्यावावत जीं मुक्ताफळें वाहेर पडतात, त्यावरच बिचाऱ्या परदेशीय प्रवाश्यांना आपले भारताबाबतचें नवोदित कुतूहल भागवून घ्यावें लागतें. याचा परिणाम असा होतो की, बरेचशे परदेशीय प्रवासी भारतीय साहित्य व कला यांच्यावावत चुकीची माहिती पदरांत बांधून व भयानक भ्रम बरोबर घेऊन स्वदेशी जातात आणि या चुकीच्या माहितीचा व भयानक भ्रमांचा त्यामुळे जगभर प्रसार केला जातो.

परराष्ट्रांतील 'भारतीय' कचेऱ्या

भारत स्वतंत्र झाल्यापासून पं. नेहरूंच्या तेजस्वी नेतृत्वाखालीं सर्वांत मोठी गोष्ट कोणती घडून आली असेल तर ती जगांतील वहुतांश राष्ट्रांत भारतीय वकालती प्रस्थापित करणें ही होय. भारताच्या परराष्ट्रांतील या कचेऱ्यांवर वेसुमार खर्च बेजवाबदार रीतीनें केला जातो, अशी ओरड भारतीय लोकसभेंत वारंवार केली गेली आहे. परंतु तिच्याकडे दुर्लक्ष करून भारताला जगांतील सर्व राष्ट्रांत बहुमानाचें स्थान

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राप्त व्हावें या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन पं. नेहरूंनी आपलें धोरण धैर्यानें व क़ांहीशा अट्टाहासानेदेखील चालूंच ठेवलें. परराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रांत पं. नेहरूंचें हें धोरण जगाचे डोळे दिपविण्याइतकें प्रभावी ठरलें आहे यांत शंकाच नाही. प्रत्येक महत्त्वाच्या जागतिक समस्येवर भारतीय परराष्ट्रीय धोरणाचा चांगलाच प्रभाव पडूं लागला आहे आणि त्यामुळे भारताचें नाव साऱ्या जगभर दुमदुमूं लागलें आहे.

हें सर्व अर्थात् आमच्या मृतप्राय स्वाभिमानास अमृतसंजीवनी प्राप्त होण्याइतकें विलोभनीय आहे. पण पं. नेहरूंच्या ज्या वैशिष्ट्यपूर्ण, शांततावादी व स्वतंत्र धोरणामुळे भारताचा डंका साऱ्या जगांत वाजूं लागला आहे व ज्यामुळे भारतीय साहित्य, कला व समाजजीवन यांच्या बाबत बेसुमार कुतूहल जगभर निर्माण झालें आहे, त्या धोरणाचीं परराष्ट्रांतील जणूं प्रतीकें म्हणून वावरणाऱ्या भारताच्या परराष्ट्रीय कचेऱ्या कशा स्वरूपाच्या आहेत, आणि कशा स्वरूपाच्या असाव्यात, याबाबत पं. नेहरूंचें पूर्ण दुर्लक्ष होत आहे, असें आम्हांस मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. परराष्ट्रांतील या 'भारतीय' कचेऱ्यांतील एकंदर वातावरण पूर्ण 'अ–भारतीय' असतें, असें आम्ही कांहीशा स्वानुभवावरून व विश्वासनीय माहितीच्या आधारें सांगूं शकतों. परदेशांतील भारतीय कचेऱ्यांची गोष्ट 'दृष्टी आड सृष्टि' या नात्यानें जरा बाजूला सारली तरी भारताची राजधानी जी नवी दिल्ली तिची तरी काय अवस्था आहे ? नवी दिल्ली इतकें, अ–भारतीय वातावरणानें बुजबुजलेलें नगर अन्यत्र आढळणें दुरापास्त आहे. रचना, इमारती, स्मारकें, इत्यादि जड व स्थूल गोष्टी इंग्रजांचा वारसा म्हणून जरा बाजूस सारल्या तरी मोठमोठे सरकारी अधिकारी, मोठमोठ्या 'भारतीय' वृत्तपत्रांचे प्रतिनिधि व संपादक मोठमोठ्या समारंभांत व सभा–संमेलनांत पुढेपुढे करणारे लोक या सर्वांचें आंग्लवेड व पाश्चात्यधार्जिणेपणा यांचा परदेशीय प्रवाश्यांवर जो परिणाम होतो तो असा की, भारतांत 'भारतीय' असें कांहीच नाही ! शांततावादी, स्वतंत्र व विस्मयजनक वैशिष्ट्यानें विनटलेल्या भारताच्या परराष्ट्रीय धोरणामुळे भारताबाबत परदेशीय पंडितांच्या, साहित्यिकांच्या, कलावंतांच्या व पत्रप्रतिनिधींच्या मनांत निर्माण झालेलें बेसुमार कुतूहल अशा रीतीनें हे परदेशीय लोक भारतांत प्रवेश करतांच विरून जातें.

वस्तुस्थिति अशी आहे की, नेहरूप्रणीत भारताच्या शांततावादी स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणाच्या-पाठीशी भारतीय संस्कृतीची भव्य परंपरा उभी आहे. ज्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांमुळे भारत जगाकडे भव्योदात्त अशा शांततावादी ध्येयानें प्रेरित होऊन पाहूं शकतो व तदनुसार जागतिक राजकारणावर प्रभाव पाडूं शकतो, तीं सांस्कृतिक वैशिष्ट्यें भारतांत व परराष्ट्रांतील भारतीय कचेऱ्यांत जर परराष्ट्रीय लोकांना दिसूं शकलीं नाही, तर जगावर त्याचा काय परिणाम होईल ? भारताची ही विश्वदृष्टि म्हणजे पं. नेहरू या अपवादभूत पण महनीय विभूतीचें केवळ एक वैयक्तिक वेड आहे, आणि या भव्योदात्त विश्वदृष्टीचा व तज्जन्य स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण अशा भारताच्या शांततावादी परष्ट्रीय धोरणाचा भारतीय जीवनाशी, साहित्य कलेशी कसलाहि जिव्हाळ्याचा संबंध नाही, असा समज जगभर हळुहळू दृढमूल होऊन बसेल आणि त्यामुळे भारताला आज जागतिक राजकारणांत जें बहुमानाचें स्थान प्राप्त होऊं लागलें आहें तें कदाचित् नष्टहि होऊन जाईल.

हें दुर्लक्ष भयावह आहे !

म्हणून आम्ही असें नम्रपणें केंद्रीय सरकारला कळवूं इच्छितों कीं, भारताचें भारतीयत्व कशांत साठलें आहे हें नीट संशोधून भारतांत, परराष्ट्रांतील भारतीय कचेऱ्यांत आणि विशेषतः भारताच्या सर्व मोठमोठ्या नगरांत भारतीय संस्कृतीचीं वैशिष्ट्यें कोणाच्याहि सहज नजरेंत भरतील अशी व्यवस्था करण्यांत यावी. विशेषतः भारतीय साहित्य, कला व संगीत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांच्याकडे आज होत असलेलें भयावह दुर्लक्ष बाजूस सारून प्रादेशिक भाषेंतील साहित्यकार आणि कलावंत यांना समाजांत मानाचें स्थान प्राप्त होईल यावाबत समंजस प्रयत्न करण्यांत यावेत. केवळ पुरातनच नव्हे, तर आधुनिक भारतीय साहित्यकार व कलाकार यांच्या नामवंत कृतींचा अभ्यासपूर्वक गौरव होऊन हा गौरव परराष्ट्रीय प्रवाशांना समंजसपणें निवेदन करूं शकणारे रसिक व मर्मज्ञ बुद्धि पुरस्सर तयार करण्याची योजना हातीं घेण्यांत यावी. आंग्लवेड, पाश्चात्यधार्जिणेपणा व तज्जन्य न्यूनगंड यांनी पछाडलेल्या पोपाखी लोकांचा परराष्ट्रीय प्रवाशांशी कमीत कमी संबंध येईल अशी व्यवस्था करण्यांत यावी. पाश्चात्य प्रवाशांशी भारतांबावत कोणी बोलावयाचें व काय बोलावयाचें, यावावत एक निश्चित योजना आखण्यांत आली पाहिजे. याचा अर्थ परराष्ट्रीय प्रवाशांच्या विमुक्त संचारावर बंधन घालण्यांत यावें असा नाही. पण त्यांना ज्या भारतीय गोष्टींबाबत कुतूहल व जिज्ञासा वाटत असेल ती कोण पुरी करूं शकेल यावावत निश्चित माहिती त्यांना देण्याची सोय सहज करतां येण्यासारखी आहे. अशी सोय नसल्यामुळेच हे परराष्ट्रीय प्रवाशी आंग्लवेडया व पाश्चात्यधार्जिण्या अशा 'भारतीय आंग्ल' लोकांच्या कचाटयांत सापडतात आणि भारताबाबत भलभलते व भयानक भ्रम बरोबर घेऊन स्वदेशी रवाना होतात. अशा या अनागोंदी, निर्बुद्ध नादान कारभारामुळे भारताची पाश्चात्य राष्ट्रांत केवढी भयानक बदनामी केली जाते याकडे आता दुर्लक्ष करणे अक्षम्य ठरेल.

भारतीय साहित्याची बदनामी

श्रीमती राजी यांनी आरंभीं आम्ही उल्लेखिलेल्या आपल्या लेखांत एका नमुनेदार प्रसंगाचें यथार्थ वर्णन केलें आहे. एका आंग्ल साहित्य समीक्षकाला भारतांतील नाटच व रंगभूमि यांची माहिती हवी होती. म्हणून तो एका साहित्य संमेलनात उपस्थित झाला व भारतीय नाटच व रंगभूमि याबाबत अनेक प्रश्न विचारूं लागला. आंग्लवेडे व पाश्चात्यधार्जिणे असे कांही लोकहि या संमेलनांत उपस्थित होते. एक आंग्ल साहित्यसमीक्षक भारतीय रंगभूमीबद्दल प्रश्न विचारतो आहे असें दिसून येताच हे लोक पुढे सरसावले व त्या आंग्ल साहित्य–समीक्षकाला 'भारतीय' सांस्कृतिक पुनरुत्थानाबाबत मोठया उत्साहाने आपल्या सफाईदार आंग्लभाषेंत माहिती देऊं लागले. आमच्याकडे शेक्सपीअर, शेरिडन व शॉ यांची नाटकें रंगभूमीवर आणलीं जातात, एवढेंच नव्हे, तर अद्ययावत असे कॉक्टो, सार्त्र इत्यादि लेखकांचींहि नाटकें आमच्या रंगभूमीवर केलीं जाऊं लागलीं आहेत. तो बिचारा आंग्ल समीक्षक हें सर्व ऐकून थक्कच झाला'. त्याने विचारलें, 'भारतांत भारतीय नाटककार कोणी आहेत की नाहीत ? व त्यांचीं नाटकें रंगभूमीवर केलीं जात नाही कां ?' आमच्या आंग्लवेडया भारतीयांनी त्याला सांगितलें, 'छे. भारतीय नाटककार कोणी आहेत, हें आमच्या ऐकिवात देखील नाही.'

श्रीमती राजी आपल्या लेखांत म्हणतात, 'या आमच्या भारतीय आंग्लांना मराठी व गुजराती नाटककारांनी रंगभूमीवर नवे नवे प्रयोग केल्याचे माहित नव्हते. आणि मौज ही की, हे प्रयोग त्याच वेळीं जवळच दिग्दर्शित केले जात होते. या आमच्या भारतीय आंग्लांना भारतीय साहित्याचे व रंगभूमीचें जग परकें व टाकाऊ वाटत होतें. कारण हे भारतीय आंग्ल आपल्याला त्याहून आपण कांही निराळे व फारच उच्च दर्जाचे आहोंत, असें लेखीत होतें. तेथे एक मराठी नाटककार जवळच बसला होता. वरील संवाद ऐकून तो उद्गारला, "आणि हें आमचें 'भारतीय साहित्य संमेलन !"

श्रीमती राजी म्हणतात, आंग्ल भाषेंत लिहितात की, लिहिणारे भारतीय लेखक आणि आंग्लवेडें पोशाखी पंडित व रसिक यांनी भारतीय साहित्यांबद्दल व भारतीय समाज व सांस्कृतिक जीवनाबद्दल पाश्चात्य जगांत भयानक भ्रम निर्माण करून ठेवले आहेत. प्रादेशिक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाषांतील भारतीय वाङ्मय जणुं वाङ्मयच नव्हे, कारण तें इंग्रजींत नाही, अशी या लोकांनी आपली समजूत करून घेतली आहे व तिचाच पद्धतशीर प्रचार पाश्चात्य देशांत हे लोक सदैव करीत असतात.

श्रीमती आपल्या लेखांत लिहितात की प्रादेशिक भाषांतील साहित्य हेंच खरें भारतीय साहित्य होय या साहित्याचें इंग्रजींत भाषांतर केलें गेलें नसल्यामुळे तें मागें पडलें आहे, दुर्लक्षिलें गेलें आहे. या साहित्याला मानाचें स्थान या आंग्लवेड्या देशांत अद्याप मिळालेलें नाही. जनता व सरकार उभयतांकडून दुर्लक्षिलें गेल्यामुळें हे खरे भारतीय साहित्यिक आपापल्या कुंपणाआड दडून बसले आहेत व त्यामुळे प्रादेशिकता व संकुचित दृष्टि यांच्या आहारीं ते जाऊं लागले आहेत.

प्रादेशिक साहित्य हेंच खरें भारतीय साहित्य होय आणि या भारतीय साहित्याकडे व त्याच्या निर्मात्यांकडे भारतीय सरकारने व जगांतील साहित्यिकांनी व रसिकांनीहि लक्ष पुरविलें पाहिजे, ही महत्त्वाची गोष्ट जगाच्या चव्हाटयावर उत्तम रीतीने मांडल्याबद्दल श्रीमती राजी यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों.

'भारतीय साहित्य अकादमी' आता नव्यानेच नव्यादिल्लींत स्थापन झाली आहे. तिच्याहि नजरेस आम्ही श्रीमती राजी यांचा लेख आणूं इच्छितो. आणि त्या लेखांत ध्वनित झालेल्या भारतीय साहित्याच्या व साहित्यिकांच्या समस्या सोडविण्याच्या कामी भा. सा. अकादमी योग्य ते उपाय योजील, अशी आशा करतों.

विदर्भ साहित्य संघ, प्रकाशन नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी-मराठी भाषा प्रवेशिका

लेखिका : मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी. किंमत : सव्वा रुपया

एकमेव विक्रेते : कर्मवीर बुकडेपो, महाल, नागपूर २

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

गाडी थांबली दारांत

ओळखीच्या घुंगुरांचे
नाद रानीं निनादले
हृदयांत प्रतीक्षेने
पंख वाई पसरले

हलकेंच लवंडली
लवणांत काळी माती
आकाशांत उजळल्या
तारखांच्या लाख ज्योती

उफाळून आलें वर
उभ्या जवारीचें स्मित
झिंगलेलीं तृण पातीं
दंग दंवाच्या मिठींत

स्थिरावला समाधींत
अंगणींचा पारिजात
व्हरली प्रीत त्याची
कळीकळीच्या गर्भांत

चांदण्याच्या पंखावर
तरळले धूलीकण
यामिनीच्या कंकणाची
ओसरली किणकिण

गाडी चाले भर-धाव
ध्वनी विरे चाकोरींत
हुरहुरे जीव माझा
अनामिक जाणिवेंत

माहेरचा गार वारा
सासरची उब न्यारी
बावरल्या हरणी गे
अतां यायचा शिकारी

अतां यायचा शिकारी
मनीं माझ्या चांदरात
ओळखीच्या घुंगुराची
गाडी थांबली दारांत !

आगगाडिच्या खिडकीपाशी

आगगाडीच्या खिडकीपाशी
बसलों होतों सहज रेलुनी
समोर तूं ग आलिस माझ्या
वीज नाचवित गात्रांमधुनी

मध्यरात्रिची भेदुनि शांति
डब्यांत होती नाचत वर्दळ
उरांत माझ्या वाढत होतीं
नवीं स्पंदनें; नवीन वर्तुळ

कुजबुज होती पुढे नि मागे
डोक्यावर पंखे गरगरते
तुझी हालली नजर जराशी
क्षणांत जडलें अक्षय नातें

क्षणांत जडलें अक्षय नातें
नवें निर्मिलें आपण बंधन
आगगाडिच्या खिडकीपाशी
आणिक तूं मी बसलों रेलुन

— बाबा मोहोड

भरती ओहटी

माझ्या मनाच्या जळांत
भरतीची लाट येते
कोटि कोटि भावनांचीं
स्वैर उठतीं आवर्तें...

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अतन्द्र मी तिथे माजीं
करीतसे मुक्त स्नान
तुम्हातेंहि घडवावें
वाटे तियेचें दर्शन...

शोधितों मी रंग माझे
तिचें रेखाटण्या चित्र
परी रंगकुंभ सारे
गेले असती वाहत...

पीत मदिरा क्षणांची
काळ निघोनिया जाई
ओहटीची धडपड
आणि नजरेंत येई

दूर उघड्या वाळूंत
कुंभ दिसतात छिन्न
शकलांत कुठे जरा
रंग असे चिकटून...

घेवोनिया करीं त्यातें
काढीतसें अगतिक
भरतीची रेखाकृति
कशीतरी मी तुटक...

रंग साधना माझी ती
बघोनिया तोकडीच
ओरडतां तुम्ही सारे,
" महाकवि खास हाच !"

— वसंत निनावे

' स्मृति- !'

संथ जलाशय,
खडा टाकतां त्यांतुनि उठलें
इवलें नर्तन !
भिरभिरलें मन
स्मृतिगारांतुन, असेंच घडतां
नाजुक दर्शन ! !

ऊब स्मृतींची,
शिशीरांतली हवी हवीशी
उष्ण शेकोटी !
सुखावलें तन
आसुसलेल्या, उष्ण उष्णतर
गूढ निःश्वास कांठीं !!

सुटला भवतीं,
सुवास एकच भावसुमांचा
अति आल्हादक !
धुंद होउनी
प्राशियली मी, मूकपणी अन्
स्मृति...स्मृतीच संजीवक !!

— मुरलीधर उगले

फुलतें जीवन

फुलतें जीवन ढगाढगांतुन
ओघळणाऱ्या जलबिंदूतुन
फुलतें जीवन हिरवळलेल्या
भूदेवीच्या कणांकणांतुन

फुलतें जीवन प्राचिमुखावर
जेव्हा उदया येतो दिनकर
फुलतें जीवन प्रशांत शीतल
शशिकिरणांच्या सुखशय्येवर.

जीवन हंसतें तृणपर्णावर
ओघळलेल्या दंवबिंदूतुन
जीवन हंसतें शिवारांतले
मोत्यांच्या घोसांघोसांतुन

जीवन हंसतें वारवधूच्या
लटक्या रुसव्यांतुन चिरंतन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवन फुलतें प्रियकर स्पर्शें
रमणीच्या गात्रांगात्रांतुन

जीवन फुलतें तरुण मनांतुन
गुलाब हंसरे दिसता अवचित
जीवन हंसतें डोळ्यांमधुनी
भाव मनींचे असता प्रकटत

रुसलें जीवन परंतु कांही
गरीबांच्या झोपडींत शिरले
जरा पेंगले तिथेच ते अन्
त्यांच्यासाठी कधी न फुलले

—सुरेश इनामदार

क्षितिज

(ऑगस्ट ५४ च्या अंकांतील श्री. वसंत निनावे यांच्या कवितेस उत्तर)

अनाद्यन्त मी परमेशासम
मातापितरें कुठलीं मजला ?
नभधरतीच्या अंकीं दत्तक
देता मजशीं व्यर्थ कशाला ?

जर कां होतें मजकारण तें —
नभधरतीचें अशक्य मीलन
सुफलित कधिं ही धरा न होती
तेज नभाचें पोटीं लपवुन

मी तर केवळ स्वप्न घरेचें
दृष्टिपथाची अंतिम सीमा
आभासात्मक विश्व व्यापिलें ...
कवितेपुरता उरला महिमा !

गणेश पाठक

स्मरतें तें मीलन

शहारला एकांत, लाजले गहन कुसुंबी क्षण
अन् बकुळीच्या तळीं उभी तूं जाहलीस उन्मन

थरथरली तव अधरांपाशीं मौनाची पाकळी
स्मितांतुनी पण नकळत जुळली हृदयाची सांखळी

बावरल्या नयनांत बहरलें उत्कट कांही निळें
स्कंधावरला उगीच अवखळ पदर सारखा ढळे

श्वासांमधुनी ऊन थर्थरे आवाहन जांभळें
हृदयस्पंदनीं मत उमलले उन्मादाचे कळे

अजाणता धुंदींत चंदनीं करीं मिसळले कर
अन् विसलें–तूं होतिस माझ्या रेलुन वक्षावर

शहारला एकांत तेघवा बकुळ लाजली क्षण
सरलेली ती रात्र आज–पण स्मरतें तें मीलन

— उ. रा. गिरी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वदतोव्याघात युग

लेखक **मा. ज. कानेटकर**

(श्री. मा. ज. कानेटकर प्रभावी वक्ते, झुंजार पत्रकार व स्वार्थत्यागी देशभक्त म्हणून प्रसिद्धच आहेत. त्यांच्या खास शैलींत लिहिलेला हा लेख 'युगवाणी'च्या वाचकांना खास आवडेल.)

फार दिवसांपूर्वीची गोष्ट. माझे मित्र श्री. अण्णाजी वाचासुंदर डॉक्टरकडे चालले होते. रस्त्यांत भेट झाली व सहज गप्पा सुरू झाल्या. अण्णाजी म्हणाले, 'कायहो माधवराव ! आज जो कोणी बीमार पडतो त्याचें मूळ कारण असें कीं निकस अन्न सतत खाल्ल्यामुळें त्याच्यात त्राण नसतें त्यामुळें कोणतेही रोगजंतु त्याचेवर यशस्वी आक्रमण करतात. निकस अन्न खाणें त्याला भाग पडतें याचें कारण त्याचेजवळ पुरेसे पैसे नसतात. आतां तुम्हींच सांगा कीं अशा बीमाराला डॉक्टरानी इंजेक्शन दिलें व त्या इंजेक्शनचें बिल जर पांच रुपये केलें तर त्या देण्याच्या काळजीपायीं तो बीमार दुरुस्त कसा होणार ? मूळ निष्कांचनतेवर वाढती निष्कांचनता हा परिणामकारक इलाज कसा ठरणार ? मला तर असें वाटतें कीं ज्या प्रत्येकवेळीं असा रोगी डॉक्टरकडे जाईल त्यावेळीं त्याला इंजेक्शन देऊन त्याचेकडून पांच रुपये लुबाडण्याऐवजीं त्या रोग्यालाच जर उलट डॉक्टर पांच रुपयांची नोट देत गेले तर कदाचित् रोगी जास्त लवकर व अधिक खडखडीत बरा होईल.'

अण्णाजी सहज बोलत होते पण त्यांचे वरील म्हणणें किती सारगर्भित आहे ! आजाराचें मूळ कारण दारिद्र्य. त्याचा परिणाम त्राण नसणें, त्याचा परिणाम आजार आणि या आजारावर औषध इंजेक्शन म्हणजे वाढतें दारिद्र्य. दारिद्र्यावर वाढतें दारिद्र्य हा परिणामकारक इलाज कसा ठरणार ? आहे कीं नाही हा एक नमुनेदार वदतोव्याघात !

त्या दिवसापासून मी अनेक प्रश्नांकडे या दृष्टीनें पाहूं लागलों आणि चमत्कार असा कीं मला सर्वत्र इतकें वदतोव्याघात दिसूं लागले कीं मला तर वाटूं लागलें कीं आपण वदतोव्याघातयुगांत तर वावरत नाहीना ! पण आमचें जीवन आज इतकें शीघ्रगामी बनलें आहे कीं आम्हांला संथपणें विचार करून एखाद्या योजनेचे परिणाम तर्कानें आगाऊ जाणण्याची जणुं सवडच नाही. याचें वर्णन राजाजींनीं फारच मार्मिकपणें केलेलें जिज्ञासू वाचकांच्या लक्षांत असेल. चालू मोटार बंद न करतां तिची दुरुस्ती करण्यागत आमचे समोरील राष्ट्रीय प्रश्नांचें स्वरूप आहे. म्हणूनच आम्हांला 'चलने दो' या एकमेव धोरणानें राष्ट्राचा गाडा हांकलणें भाग पडत आहे व त्यांतूनच मी म्हणतों तें वदतोव्याघातयुग निर्माण झालें आहे.

निव्वळ मासला म्हणून या लेखांत मीं कांही मोजक्या, अतिशय मनोरंजक पण त्यावरोबरच, राष्ट्रदृष्ट्या परिणामीं भयावह अशा कांही वदतोव्याघातांचे पुढें वर्णन करीत आहें.

स्वार्थच स्वार्थत्याग बनला

स्वार्थत्यागाचा अर्थ फार स्पष्ट आहे. जवळ असल्यापैकीं कांहीं देऊन टाकणें अथवा जें सहजगत्या प्राप्त होणें शक्य आहे त्याचा अव्हेर करणें. आमच्या आजच्या समाजव्यवस्थेंत व देशसेवेच्या आराखाड्यांत आम्हीं देशभक्तीलाच सर्वांत अधिक फायदेशीर धंद्याचें स्वरूप देऊन मोकळे झालों आहोंत. आमच्या देशांतील राजकारणांत आणि समाजसेवेच्या सर्व क्षेत्रांत चाललेल्या लाथाळीचें मूळ या वदतोव्याघातांत आहे.

मॉंक्टन नांवाचे एक इंग्लंडचे मंत्रि झाले. हे एक उत्कृष्ट वकील होते व खासगी वकीलीच्या धंद्यांत यांचे वार्षिक उत्पन्न पन्नास हजार पौंड असे. मंत्री या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नात्यानें त्यांचा पगार वार्षिक फक्त साडेपांचहजार पौंड होता. एवढा जबर स्वार्थत्याग करणारा माणूस देशभक्ताशिवाय दुसरा कोणी असूंच शकत नाही. इंग्लंडमधें पार्लमेंटचा सदस्य होणें हें मोठया जिकीरीचें व स्वार्थत्यागाचें काम ठरतें आणि म्हणूनच सामान्यतः देशभक्त व सेवाभावी लोकच पार्लमेंटचे सदस्य बनतात.

आमच्याकडील असेंब्ली सदस्यांकडे व पार्लमेंटच्या सदस्यांकडे पहा. निदान शेंकडा पन्नासच्या वर लोकांचें असें आढळून येईल कीं त्यांना लोकप्रतिनिधी म्हणून जें द्रव्य प्राप्त होतें तेवढें त्यांनी स्वतःच्या जीवनांत स्वपराक्रमाच्या भरंवशावर कधींच मिळविलें नाही. म्हणजे ज्याचें खासगी मासिक उत्पन्न द. म. फक्त ३० रु. होतें तो असेंब्ली सदस्य झाला म्हणजे घरबसल्या (कारण असेंब्लीगृहांतही तो पेंगतच राहतो) द. म. १५० रु. मिळवितो आणि वर त्याला देशभक्त व स्वार्थत्यागी पुढारी म्हणून कीर्तिहि प्राप्त होते. आहे कीं नाहीं नमुनेदार वदतोव्याघात!

कामाचा उरक

कामें लोंबकळत ठेवणें यालाच लोक आतां कामें संपविणें समजूं लागले आहेत. समजा एखाद्या अर्जाचा निकाल लागायचा असेल तर तो अर्ज सहा माणसांच्या हातून जाऊन त्याचा अखेर निर्णय लागावयास पाहिजे. अशा परिस्थितींत त्या अर्जाबाबत अखेरचें होकारात्मक अगर नकारात्मक उत्तर अर्जदाराला मिळालें म्हणजेच तो अर्ज खरा निकालांत निघाला असें म्हणतां येईल. पण आज असें नाही. आज तो अर्ज या सहा लोकांच्या चक्रव्यूहांत वर्षानुवर्षें गिरक्या खाऊं शकतो व असें असलें तरी त्या सहाहि जणांना 'अर्ज निकालांत काढल्याचें' पूर्ण समाधान मिळत राहतें. कोणालाहि विचारा 'काय, माझ्या अर्जाचा कोणता मुकाम आहे?' तो मोठ्या उत्साहानें उत्तर देतो, 'वा! तुमचा अर्ज मी तर केव्हांच पुढें पाठविला. मजकडे तो आतां नाही.'

हें कसें चाललें आहे तें उदाहरणानें अधिक स्पष्ट होईल. समजा एका चाळींत सहा माणसें राहतात. पैकीं एकाच्या ब्लॉकमधें साप निघाला. आतां साप असेल तर त्याला ठार करणें हाच त्याचा निकाल लावण्याचा एकमेव मार्ग आहे. त्याऐवजीं जर ते शेजारी त्या सापाला फक्त एकमेकांच्या ब्लॉकमधें आळीपाळीनें हुसकवून देऊं लागले तर ज्यानें साप हुसकाविला तो जरी म्हणूं शकला कीं त्याच्या घरांत साप नाही तरी संपूर्ण चाळीचा विचार केला तर साप निकालांत निघाला असें म्हणतां येणार नाही. यामुळें सापाला जिवंत ठेवणें म्हणजेच सापाला मारणें असा वदतोव्याघात निर्माण होईल. आमच्या आजच्या राज्यकारभारांत 'Disposal' अर्थात् प्रश्न निकालांत काढण्याचें तंत्र असेंच दुष्चक्रांत सांपडलें आहे.

व्यापार क्षेत्रांत

अलिकडे आमच्या देशांत शिशुसंगोपनगृहें निघूं लागलीं आहेत व अनेक 'दानशूर' व्यापारी त्याकरितां मोठमोठ्या देणग्या देतांना दिसतात. पण या व्यापाऱ्यांनी देणगी दिलेला पैसा कसा मिळविलेला असतो याचा शोध केला तर संभवतः असें आढळून येईल कीं शिशुसंगोपनगृहाला देण्यांत येणारी देणगी लहान मुलें व युवक यांच्या जिवाला व आरोग्याला धोका निर्माण करून मिळविलेल्या पैशांतूनच देण्यांत येते. एक तेलाचा व्यापारी खाण्याच्या तेलांत व्हाईट ऑईलची मनमुराद भेसळ करून भरपूर पैसे मिळवितो. असें करीत असतां हजारों अर्भकें व युवक यांच्या आरोग्याचा तो नाश करतो. कदाचित् कांहींचे तो प्राणहि घेत असेल. आणि याच पैशापैकीं थोडें द्रव्य तो अर्भकांच्या संगोपनाकरितां देतो. म्हणजे अर्थ असा कीं लहान मुलांचें संगोपन करायचें तर प्रथम त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण करूनच तें करतां येईल. याचा अर्थ ज्याला समजूं शकेल त्याने तो समजून घ्यावा. मला मात्र कळूं शकला नाही.

शिक्षणक्षेत्र

शिक्षणसंस्था वाढत आहेत पण शिक्षणाचा दर्जा कमी होत आहे. ज्या शिक्षकांनी लहान मुलांना सत्यप्रिय करावें अशी आम्हीं अपेक्षा करतों तेच शिक्षक खोटे अर्ज करून सुटी मिळवितांना दिसतात. शिक्षणाचा संस्कार होऊन समाजांतील न्यायप्रियता वाढावी अशी आम्हीं आशा करतों. पण या ठिकाणीं काम करणारे प्राध्यापकच मुळीं अन्यायाच्या भूमिकेवरून मुलांना मार्क देऊं लागले आहेत. खरें पाहिलें तर शिक्षणाचें स्थान राष्ट्रपुरुषाच्या हृदयाचें आहे. शरीरांतील इतर भाग रोगग्रस्त झाले तरी तेथें औषधपाणी अगर मलन-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पट्टी करण्याची आशा करतां येईल पण हृदयाच्या स्पंदनांतच जर फरक पडला, हृदयक्रियाच जर क्रमशः वंद पडूं लागली तर मग प्राण जाण्याचा क्षण नजीक आहे असें समजण्यास हरकत नाही. खुद्द शिक्षणक्षेत्रां- तील भ्रष्टता हें राष्ट्रपुरुषाच्या हृदयाचेंच स्पंदन विकारी वनल्याचें प्रतीक नव्हे काय ? यामुळें हवे ते अनर्थ निर्माण होऊं शकतील पण या अनर्थपरंपरेला थोपविण्याची इच्छा व ही इच्छा कार्यान्वित करण्या- करितां लागणारें धैर्य यांचा मला तरी सर्वत्र अभाव दिसत आहे. अशा शिक्षणांतून निर्माण होणारे युवक हेच आमच्या देशाचे भावी आधारस्तंभ आहेत आणि इकडे तर या आधारस्तंभानाच वैचारिक कीड लाग- ण्यासारखी परिस्थिति आज शिक्षणक्षेत्रांत निर्माण झाली आहे. या वदतोव्याघातांतून किंबहुना दुष्चक्रांतून कोणती सुटका निघणार आहे हें भविष्यच दाखवील.

वर जी मासलेवजा उदाहरणें दिलीं आहेत त्यांच्या दिशेने कोणीहि विचारवंत वाचक विचार करील तर आम्हीं चौफेर दुष्चक्रांच्या तावडींत सांपड- ल्याचें त्याला स्पष्ट दिसून येईल. आजची आमची प्रत्येक हालचाल आमच्या मूलभूत उद्दिष्टांच्या थेट उलट परिणामांकडे नेत आहे याची जाणीव सुद्धां आज आमच्यांत शिल्लक उरली नाही. त्यामुळें किती भयंकर परिस्थिति निर्माण झाली आहे इकडे विचारवंतांचें लक्ष वेधावें, निव्वळ या एकमेव उद्देशानें आमच्या समोरील गोळावेरीज परिस्थितीचें थोडें अतिरंजित (माझ्या मतें तर तें यथार्थच आहे) वर्णन करून हा लेख संपवितों.

देशदृष्ट्या मोजमाप काढलें म्हणजे आमचा आजचा खाक्या असा आहे :– "देश जिवंत रहावा या एकमेव उद्देशानेंच देशाचा प्राण जाण्यास कारणीभूत होतील अशीं लहान मोठीं कामें आम्हीं अहोरात्र करीत आहोंत. सर्वत्र प्रेम व सहकार यांचें वातावरण निर्माण करण्याकरितांच आम्ही ईर्षेनें परस्परांचा मत्सर व तिरस्कार चालविला आहे. भारत हें एक आत्मसम्मानित राष्ट्र व्हावें म्हणूनच आम्हीं व्यक्तिशः हुच्चपणाचा स्वीकार केला आहे. भारत बलशाली व्हावा म्हणूनच आम्हीं परस्परांची खच्ची करीत आहोंत. जातीयतेचें महान संकट भारतावरून दूर व्हावें म्हणूनच आम्हीं सर्व निवडणुकी जातीयतेच्या एकमेव गमकावर लढवि- ण्याचें ठरविलें आहे. देशांत रामराज्य निर्माण होण्या- करितांच आम्हीं व्यक्तिशः रक्षवृत्तीचा स्वीकार केला आहे. अहो ! काय म्हणून काय सांगावें ! देशांत सर्वत्र उजेड पडावा या उद्देशानेंच आम्हीं उजळते दिवे मालवीत आहोंत.

अजूनही आमची कार्यप्रणाली आपल्या लक्षांत आली नाही काय ? अहो ! गव्हाचें मुबलक पीक प्राप्त व्हावें म्हणूनच आम्हीं ही गोखरूची पेरणी चालविली आहे.

भगवान् श्रीकृष्णाचें विश्वरूप पाहून अर्जुन जेवढा भयभीत झाला असेल त्या मानानें या वदतोव्या- घातांचे विश्वव्यापी स्वरूप पाहून मी कितीतरी अधिक भयग्रस्त झालों आहे. फरक इतकाच कीं अर्जुनानें विनंती केल्यावरोबर भगवान् श्रीकृष्णानें पुनश्च आपलें सौम्य स्वरूप धारण केलें पण वदतोव्याघातांचा हा राक्षस मला आपल्या दातांखाली रगडल्यानंतरच शांत होईल असें मला वाटूं लागलें आहे.

तें जसें व्हायचें तसें होईल. पण आज मला तरी एवढाच इलाज सुचतो. या राक्षसापुढें नम्रभावानें डोळे मिटून साष्टांग नमस्कार घालणें व जें होणार असेल त्याची निमूटपणें वाट पाहत बसून होणारें सहन करणें यापेक्षां आजच्या असहाय जनतेला निराळा एखादा पर्याय शिल्लक असल्याची निदान या क्षणापावेतों तरी मला जाणीव नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्याला अस्तित्व आहे कां ?

लेखक – पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

हा प्रश्न पुष्काळांना मोठा विचित्र वाटेल. कोणी विस्मयचकित होऊन उद्गारतील, 'काय विचित्र प्रश्न ! म्हणे 'आपल्याला अस्तित्व आहे कां ?' अहो, अस्तित्व नसतं तर हा प्रश्न तरी विचारावयाला कोण बाकी उरलं असतं ?' –

ठीक आहे. मान्य करतों मी थोडावेळ की, तुम्हाला अस्तित्व आहे. पण मी तुम्हाला अशी विनंती करतों की, कृपा करून आणखी एक दोन प्रश्न तुम्ही आपल्या मनाला विचारून पहा. 'अस्तित्व म्हणजे काय ? 'मला अस्तित्व आहे म्हणजे काय ? कशाकरतां हें अस्तित्व आहे ?' –

तुम्ही म्हणाल, 'मी आहे' ही जी माझी जाणीव तिचें नाव अस्तित्व.' ठीक आहे. हा पहा रस्त्याच्या बाजूला एक दगड पडला आहे. तो तुम्हाला व मला दिसतो. म्हणून त्याला 'अस्तित्व' आहे, असें आपण मानतों. म्हणजे काय ? तुम्हाला व मला 'जें दिसतं' तेंच, म्हणजे आपल्याला आपल्या ज्ञानेंद्रियांच्या द्वारें ज्याची 'जाणीव' होतें, तेंच अस्तित्वशील असतें. ज्याची आपल्याला अशी जाणीवच होऊं शकत नाही त्याला अस्तित्व आहे किंवा नाही, हें आपण सांगूं शकणार नाही.

याचा अर्थ काय झाला ? अर्थ हा झाला की, आपल्याला आपल्या ज्ञानेंद्रियांच्या द्वारें, आपल्या व्यतिरिक्त अशा दुसऱ्या वस्तूची जाणीव होते, बोध होतो, तेव्हां आपण ती दुसरी वस्तु अस्तित्वशील आहे असें मानतों. सारांश, अस्तित्वाची जाणीव होण्यासाठी आपण स्वतः, आपलीं ज्ञानेंद्रियें आणि आपल्या व्यतिरिक्त स्वतंत्र, निराळी अशी तिसरी वस्तु, अशा तीन गोष्टींची आवश्यकता आहे. ह्या तीन गोष्टींची जुळणी घडून आली म्हणजेच अमुक वस्तूला अस्तित्व आहे, असें विधान आपण करूं शकतों.

एक उदाहरण

हा मुद्दा स्पष्ट होण्यासाठी आपण एक काल्पनिक उदाहरण घेऊं. एका कल्पवृक्षाखालीं एक आंधळा, एक बहिरा व एक सर्व ज्ञानेंद्रियें शाबूत असलेला, अशीं तीन माणसें बसलीं आहेत. सर्व इंद्रियें शाबूत असलेला माणूस इच्छा करतो व म्हणतो, ' मला आंबा मिळावा; लगेच त्याला आंबा दिसतो, आंब्याचें अस्तित्व त्याला जाणवतें. आंधळ्याला पहिल्याचें ' मला आंबा मिळावा ' हे शब्द ऐकूं येतात पण आंबा अस्तित्वात आलेला दिसत नाही. त्याच्या दृष्टीनें ' मला आंबा मिळावा ' एवढ्या शब्दांनाच अस्तित्व आल्याचें त्याच्या कर्णेंद्रियामुळे त्याला भासलें. पण आंबा ही वस्तु त्याला दिसली नाही व तिचें वस्तुत्वहि भासलें नाही, जाणवलें नाही. बहिऱ्याला आंबा दिसला पण 'आंबा मला मिळावा' हे शब्द ऐकू आले नाही.

वरील उदाहरणांवरून आंब्याचें, म्हणजे कोणत्याहि वस्तूचें अस्तित्व हें ज्ञानेंद्रियसापेक्ष आहे, ही गोष्ट सहज ध्यानांत येण्यासारखी आहे. सर्व इंद्रियें शाबूत असलेल्या माणसाला 'वस्तूचें अस्तित्व' या शब्दांनी जो बोध होतो तो आंधळ्यालाहि होत नाही व बहिऱ्यालाहि होत नाही. आंधळा व बहिरा यांच्या दृष्टीने 'अस्तित्व' या शब्दाला केवळ परिमित अर्थच आहे. उदाहरणांतील तीन माणसांच्या 'अस्तित्व' या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अस्तित्ववादावर पुष्कळ लिहितां येण्यासारखें आहे. पश्चिम युरोपांत या वादाने जोरदार वैचारिक आन्दोलन निर्माण केलें आहे. आणि या आन्दोलनाचा साहित्य व कलानिर्मिति यांच्यावरदेखील फार प्रभाव पडूं लागला आहे.

आपल्याला अस्तित्व आहे कां ? हें अस्तित्व कशा स्वरूपाचें आहे ? हें केवळ अस्तित्व, म्हणजे थंड, कृतिशून्य, कार्यशून्य, विकासशून्य व प्रभावशून्य असें अस्तित्व आहे की, तें कार्यक्षम, निर्मितिक्षम व प्रभावशील आहे ?

मला अस्तित्व आहे, असें म्हटल्याने ' अस्तित्व ' या शद्बाने निर्माण केलेल्या समस्येचें निराकरण होत नाही. हें अस्तित्व दगडाप्रमाणे जड नसून चैतन्यमय आहे, सुख–दु:खमय आहे, ज्ञान–इच्छा–कृतिमय आहे आणि अंत:करणाच्या अंतराळांत असंख्य संघर्ष निर्माण करणारें असें आहे. अस्तित्वाच्या दृष्टीने 'मी,' 'माझें व्यक्तित्व,' ' माझ्या आंतरिक समस्या व संघर्ष,' यांना जें मूलगामी महत्व प्राप्त होतें त्याला सर्व विचारांचें मूलाधिष्ठान कल्पून जें तत्वज्ञान, जी जीवनदृष्टि वा विश्वदृष्टि आकारास येते, तिचें नांव अस्तित्ववाद. 'मला अस्तित्व आहे,' असें सार्थतेने केवळ तोच म्हणूं शकतो की ज्याला आपल्यांतील 'मी' ची, आत्म्याची यथार्थ जाणीव झालेली आहे. इतर, 'मी आहे, मला अस्तित्व आहे', असे शद्ब उच्चारतात; पण वस्तुत: 'मी'च्या आत्म्याच्या यथार्थ जाणिवेशिवाय या शद्बांना अर्थच प्राप्त होऊं शकत नाही, हें ते विसरतात.

या अस्तित्ववादावावत पुष्कळच सांगतां येण्यासारखें आहे. त्याचें व वेदांताचें कितपत साम्य आहे, हाहि एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. याबाबत शक्य झाल्यास पुढे केव्हां तरी मी आणखी कांही सांगेन. तूर्त एवढेंच पुरें.

———

लेखकांस सूचना

१ लेख अगर कविता कागदाच्या एका बाजूने सुवाच्य अक्षरांत लिहिलेली असावी.

२ हस्तलिखितासमवेत पुरेसें टपाल हशिल पाठवावें.

३ संपादकीय निर्णयासंबंधीं पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. अस्वीकृत, पण टपालखर्च नसलेलें लिखाण एक महिन्याच्या आंत निकालांत काढलें जाईल.

संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी नाट्यसृष्टींतील अनुभव

लेखक : वा. वा. भो ळे

लेखांक ४ था समारोप

गेल्या तीन लेखांकांत महाराष्ट्र रंगभूमीचा सर्वंकष इतिहास सांगण्यांत आलेला नाही; फक्त गेल्या शंभर वर्षांतील नाट्यकलेचा म्हणजे नट, नाटककार, निर्माते आणि दिग्दर्शक यांच्या कामगिरीचा थोडक्यांत आढावा घेऊन, कोणाच्या कर्तृत्वामुळे मराठी नाट्यकला आपल्या विकासाच्या उत्कर्षबिंदूला जाऊन पोचली, हें सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. कालमानाने पाहतां अंदाजें १९०४ ते १९२० या टप्प्यांत हा उत्कर्षबिंदु साधला गेला असें मत मी प्रतिपादन केलें आहे आणि तें प्रतिपादन करीत असतां अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडिलकर आणि गडकरी यांच्या नाट्यकलेचें महत्त्वमापन करून प्रत्येकाच्या कामगिरीचा यथामति गौरव करून हा उत्कर्षबिंदु साधण्याचें श्रेय काकासाहेब खाडीलकर व 'महाराष्ट्र' नाटकमंडळींतील नटसंच यांच्या प्रभावी युतीला प्रामुख्याने दिलें गेलें आहे असें अनुमान कोणी काढील तर तें चूक होणार नाही. कै. केशवराव भोसले, कै. पेंढारकर आणि मामा वरेरकर यांनी मराठीरंगभूमीच्या सजावटींत वास्तवता व अद्ययावत्पणा आणण्याचे कामीं जें बहुमोल कार्य केलें, तें जमेस धरूनही इ. स. १९२५ नंतरच्या काळांत कांही अपवाद सोडल्यास, मराठी नाट्यकलेचा हा उत्कर्ष कायम ठेवण्याचे कामीं फारशी प्रगति झालेली नाही, किंबहुना तिला उतरती कळा लागली, असें जाणत्या आणि जबाबदार व्यक्तींचें मत ठिकठिकाणीं व्यक्त झालेलें दिसून येतें. १९२५ सालानंतर शॉ, इब्सेन, पिनेरो आदिकरून पाश्चात्य नाटककारांच्या कृतींचा अभ्यास महाराष्ट्रांत जास्त प्रमाणांत होऊं लागला; परंतु आपल्या कृतींतून तंत्रविषयक सुधारणा करण्यापलीकडे नवीन नाटककारांनी फारसें भरीव कार्य केलेलें दिसत नाही. काय सांगावयाचें व कसें सांगावयाचें या दोन कसोटीस कमीजास्त प्रमाणांत उतरणारीं नाटकें माझ्या मतें फक्त अत्रे यांचें ' उद्याचा संसार'. वर्तक यांचें ' अंधळ्याची शाळा'; भोळे यांचें ' सरलादेवी '; रांगणेकरांचें ' वैनी आणि सतरावर्षें '; नाना जोग यांचें ' भारती ' या कृतीच होत. परंतु धंदा म्हणून मराठी रंगभूमीचा जो ऱ्हास होऊं लागला तो थांबविण्यास संख्येच्या दृष्टीने या कृति अपुऱ्या पडल्या. याचाच अर्थ नाट्यकलेचा उत्कर्ष सतत कायम ठेवायचा असेल तर केवळ तांत्रिक सुधारणा, रंगभूमीची वास्तवपूर्ण सजावट, नृत्य, गायन इत्यादि गोष्टी पुरेशा पडत नाहीत, असा होतो. या गोष्टी केवळ साधनस्वरूप आहेत, त्या साध्य नव्हेत ही मख्खी आमच्या अग्रेसर नाट्यसंस्थांमधील मालकनिर्मात्यांच्या ध्यानीं आली नाही. नाविन्यपूर्ण व प्रयोगक्षम अशा नाटकांची भूक प्रेक्षकांना असते. अशा नाटकांचें अनुरूप नटसंचाकडून रंगदार प्रयोग प्रेक्षकांच्या समोर ठेवल्याने ती भूक शांत होते, हा सिद्धांत मी १९३८ मध्यें नागपूर येथे प्रसिद्ध झालेल्या 'रंगचर्चे'

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

च्या ' नाटयलेखन ' या माझ्या लेखांत मांडला होता. त्यानंतर प्रा. फडके, वि. स. खांडेकर, व. शां. देसाई इत्यादि नामवंत साहित्यिकांनीहि तो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या प्रतिपादन केला आहे. वोलवटांनी मराठी रंगभूमि बुडवली, हा निष्कर्ष सर्वस्वी खरा नाही, ही गोष्ट ' उद्याचा संसार ' 'आंधळ्याची शाळा ' वगैरे उपरिनिर्दिष्ट नाटकांच्या प्रायोगिक यशाने सिद्ध केली आहे. अशा तऱ्हेच्या नाटकांचा भरणा करण्याचें कार्य, मालकनिर्माते यांचे शिरावरच होतें व आहे ही गोष्ट १९२५ पर्यंतच्या व त्यानंतरच्याही महाराष्ट्रांतील नाटकमंडळांच्या इतिहासावरून स्पष्ट व्हावी असें वाटतें. ही कामगिरी त्यांचेकडून १९२५ नंतर झाली नाही, या मुद्द्याच्या स्पष्टीकरणार्थ कांही प्रमुख नाटकमंडळयांचा निर्देश करणें जरूर आहे. नाविन्यपूर्ण व प्रयोगक्षम नाटकें रंगभूमीवर आणण्याचें सामर्थ्य पूर्वीच्या जमान्यांत जनुभाऊ निमकरांच्याइतकें इतर मालक निर्माते किंवा दिग्दर्शक यांचेजवळ फारसें नव्हतें, ही गोष्ट 'चंद्रसेना,' 'चंद्रहास' 'शारदा' 'कुंज-विहारी' इत्यादि नाटकांच्या प्रायोगिक यशस्वितेने सिद्ध केली आहे. देवल हे 'किर्लोस्करा' मधील तालीम-मास्तर म्हणूनही प्रसिद्ध होते; परंतु त्यांनीही नवीन नाटककारांच्या कृति सुधारून घेऊन त्यांचा लाभ मराठी रंगभूमीस करून दिल्याचें उदाहरण माहित नाही. इतकेंच नव्हे तर अभिनयशिक्षक म्हणूनही त्यांच्या सामर्थ्यास मर्यादा होत्या ही गोष्ट श्री. बालगंधर्व यांचें अनुभवसिद्ध मत माझ्या एका भाषणांत मी सांगितलेंच आहे. जनुभाऊंचें सामर्थ्य असलेली एखादी व्यक्ति जर 'किर्लोस्कर' कंपनींत असती, तर कोल्हटकरांच्या नाटयकृति, कथारचना आणि व्यक्ति-दर्शन या दृष्टीने तिने सरस करून घेतल्या असत्या. तशी व्यक्ति नसल्यामुळे, विनोद आणि संगीत यांतील नाविन्यामुळे, कांही काळच कोल्हटकरांना प्रेक्षकांचें रंजन करतां आलें. जनुभाऊंबरोबरच या दृष्टीने उल्लेखिलेली दुसरी व्यक्ति म्हणजे त्र्यंबक सीताराम कारखारनीस ही होय. १९१२ चे सुमारास खाडिलकर संगीतनाटकाकडे वळले; अर्थात त्यांच्या प्रभावी नाटयकृतीचा लाभ महाराष्ट्र नाटकमंडळीस त्यापुढे होणें कठीण; टिपणीस बंधू, प्रधान, पोतनीस आदि-करून नामवंत नट कंपनी सोडून निघून गेलेले; कांही मतभेदामुळे गडकऱ्यांच्या नाटयकृति लाभणेंही मुष्कील; कर्जाचा बोजा डोक्यावर; अशा परिस्थितींत खरेशास्त्री, शंकर परशुराम जोशी व मी अशा नवीन नाटककारांना त्यांनीच रंगभूमीवर आणलें, ज्या 'विचित्रलीला' नाटकाने कंपनीचें बरेचसें कर्ज फिटलें तें नाटक, महाराष्ट्र नाटक मंडळीच्या दर्जाला येईपर्यंत कारखारनीसांनी लिहून घेतलें, असें माहितगार माणसाकडून कळतें. ज्या 'शिव-संभव' नाटकाने कंपनीला अमाप पैसा दिला त्या नाटकाचा पहिला अंक मनाप्रमाणे लिहिला जाईपर्यंत कारखारनीस एक महिनाभर माझ्याघरीं ठाण मांडून बसले होते असें खरेशास्त्री यांनी १९२१ सालीं मला स्वतःला सांगितलें. आपण तयार करून घेतलेल्या कृतींच्या यशस्वितेबद्दल कारखारनीस यांस विलक्षण आत्म-विश्वास असे,' विचित्रलीलें'च्या पहिल्या ५—६ प्रयोगाला झालेलें उत्पन्न अत्यंत निराशाजनक होतें, इतकेंच नव्हे तर वर्तमानपत्रांतून त्यावर टीकेची झोड उठली होती. अशा स्थितींत या नाटकांतील नाविन्य प्रेक्षकांच्या नजरेस हळूहळू येत आहे, ही गोष्ट त्यांचेमधेच वसून कारखारनिसांनी पाहिली व त्या नाटकाचें उत्पन्न पडलें तेव्हा दुसरें नाटक लावा, असें हितचिंतक सांगत असतांना, त्यांनी बुधवारीहि विचित्रलीलेचे प्रयोग लावण्यास सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला की, नाटकांतील नाविन्य लोकांना कळूं लागलें व व उत्पन्नाचा आंकडा भराभर वाढला. 'शिवसंभव' नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला १५० रुपयाच्या आंतच उत्पन्न झालें; तेव्हा दाते व देशपांडे या मालक द्वयास, 'शिवसंभव' ही तुम्हांस सोन्याची खाण मिळाली आहे, हा विश्वास ठेवून प्रयोग करीत राहा,' असें त्यांनी सांगितल्याचें मला माहिती आहे. नवीन नाटककार पुढे आणून, रंगभूमीवर त्यांच्या नाटकांचा भरणा त्यांनी केलाच. परंतु धंदाही यशस्वी करून निष्कर्ज अशा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्थितींत त्यांनी कंपनीची मालकी सोडली. 'नरसोपंत केळकरां'ना तुम्ही नाटक लिहिण्यास कां सांगत नाही, असें त्यांस मी विचारलें असतां, आमच्या दर्जाला पाहिजे तसें नाटक त्यांच्याकडून लिहिलें जाणार नाही असें त्यांनी सांगितलें, याचे उलट 'मेनका' आणि 'सावित्री' हीं खाडिलकरांचीं नाटकें नाकारण्याचें धैर्य अंगीं असलेली व्यक्ति 'गंधर्वनाटक मंडळींत' नव्हती. इतकेंच काय पण 'विधिलिखित' नाट्यलेखनाचा इतिहास मित्रवर्य व. शां. देसाई यांनी जो 'मखमालीचा पडदा' या पुस्तकांत दिला आहे तो अत्यंत उद्बोधक आहे. १९२१ ते १९३३ या दरम्यान नंदकुमार' 'आशा-निराशा' व आणखी दोनतीन नाटकें 'गंधर्वमंडळीनें' पुढे आणलीं, परंतु धंदा या दृष्टीने 'कान्होपात्रा' खेरीज एकही यशस्वी झालें नाही. 'बळवंत संगीत मंडळीनें' खरेशास्त्री व गडकरी यांच्यासारख्या प्रथितयश नाटककारांचाच आश्रय घेतला, परंतु एकहि चांगला नवीन नाटककार निर्माण केला नाही. 'कमतनूरकरां'चें 'श्री' नाटक सोडल्यास 'ललित कलामंडळी'च्या बाबतींत असेंच म्हणतां येईल. आणि त्या नाटकाच्या यशस्वितेचें श्रेयही 'पेंढारकरां'च्याकडे किती जाते हाही प्रश्न आहे. 'नाट्यनिकेतन' संस्थेकडूनही अद्यापपर्यंत याबाबतींत उल्लेखनीय कामगिरी झाली नाही. कारखानीसांच्या तोडीची व्यक्ति जर नाना जोग यांच्या सहवासांत आली तर जोग यांचे विषयी आशा धरावी, इतके नाट्यगुण जोग यांचे अंगीं आहेत. सरांश सावनांच्या बाबतींत कितीही सुधारणा झाली, तरी महाराष्ट्र नाटक मंडळी आणि खाडिलकर यांच्या युतीसारखी प्रभावी युति जोंपर्यंत महाराष्ट्रनाट्यकलेला लाभत नाही तोंपर्यंत कितीही नाट्यमहोत्सव केले तरी नाट्य-कलेचें पुनरुज्जीवन होणार नाही. नाट्यमहोत्सवाला अलोट गर्दी लोटत असल्याचा अर्थ महाराष्ट्रिय मनांत नाट्याची आवड ज्वलन्त आणि जिवंत आहे इतकाच.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अमेरिकन गृहिणी

लेखिका : * * * * * * सौ. उमाबाई गोखले

(या लेखाच्या लेखिका सौ० उमाबाई गोखले या प्रो० शंकर लक्ष्मण गोखले यांच्या पत्नी होत. प्रो० गोखले हे मध्यप्रदेश वऱ्हाडचे मूळचे रहिवासी आहेत. नागपुरांतील गेल्या पिढीच्या अनेक साहित्यकारांशी व विद्वान् गृहस्थांशी त्यांचा परिचय होता.ते १९२१ साली अमेरिकेंत गेले. तेथें सुप्रसिद्ध जो. ई. सी. कंपनीत मोठ्या हुद्यावर होते. प्रा० गोखले आणि त्यांच्या पत्नी सौ. उमाबाई यांना अमेरिकन नागरिकत्वाचे हक्क मिळाले असून त्यांचें सारें कुटुंब अमेरिकेंत कायमचें स्थायिक झालें आहे.अमेरिकेंत गेलीं ३०–३२ वर्षे घालविलेल्या एका महाराष्ट्रीय महिलेनें लिहिलेला हा लेख 'युगवाणी'च्या वाचकांना खासच वाचनीय वाटेल)

शिरगणती करणाऱ्या अधिकाऱ्याने प्रश्न विचारला,– 'व्यवसाय ?' तिनें उत्तर दिलें, मी नुसती गृहिणी आहे. अधिकारी हासला. तो म्हणाला, बाई तुम्ही नुसती गृहिणी असें कां म्हणतां ? गृहिणीपद हा मोठा महत्वाचा अधिकार आहे. अमेरिकेंत सर्वात अधिक महत्त्वाच्या व्यक्ती कोण असा प्रश्न कोणी मला विचारला तर मी 'गृहिणी' असें एकच उत्तर देईन." अशा गृहिणी या वेळी या देशांत चार कोटीवर आहेत. त्यांचीं विविध कामें आणि त्यांचें कर्तृत्व, या सर्वांचें एक गांठोडे बांधून त्यावर 'House wife (गृहिणी) अशी चिठ्ठी लावतात; खरोखर तिच्या महत्त्वाकडे कोणी लक्ष देत नाही.

(२) कादंबऱ्यातून मात्र गृहिणीच्या महत्त्वाचें वर्णन पुष्कळसें आढळतें. पण तें सर्व काल्पनिक असतें. प्रत्यक्ष व्यवहारांत तिचें जें महत्त्व आहे तिकडे कोणाचेंही लक्ष जात नाही आणि लक्ष दिलें तर त्याला उपहासार्थ चूल आणि मूल असें म्हणतात.

(३) श्रमजीवित्व आणि संपत्ति उत्पादन, या दृष्टीने तिची बरोबरी कोणीही करूं शकत नाही. तिच्या कामाचा पगार आकारला तर वार्षिक पगार दहा हजार डॉलरच्यावर जाईल. नवऱ्याने मिळविलेले पैसे खर्च करणें, हा तिचा अधिकार आणि तीच तिची जबाबदारी. ९८ सेन्टची भाजी, पांच डॉलरची दिवाणखान्यांतील कोचावरची अस्तरें (Covers), इत्यादि सर्व नियमित किंवा प्रासंगिक खर्च करण्यांची जबाबदारी तिजवरच असते; आणि हा सर्व खर्च पतीच्या उत्पन्नांतूनच तिला करावा लागतो.

(४) स्वयंपाकघर हा तिच्या राज्याचाच मुख्य भाग! हल्लींच्या बायकांना धुणी धुण्याची यंत्रें असतात, सैपाकाला प्रेशर कुकर असतें, अन्न संभाळून ठेवण्याला हिम–यंत्र असतें; त्या मुळें पूर्वीच्या पिढींतील बायकांपेक्षां हल्लीच्या पिढीतील बायकांना किंचित् अधिक फुरसद असते. त्यामुळें त्यांना थोडी विश्रांति घेतां येते, किंवा अन्य रीतीने करमणुकीला सवड मिळते.

(५) बायकांची नित्याचीं कामें म्हणजे दर महा १४० आंथरूणें नीट करणें ७०० पौंड अन्न शिजविणें. या शिवाय दुसरीं कामें म्हणजे मागच्यादारी भाजीपाल्याची बाग संभाळणें, आटो–मोबील चालविणें, बाजार करणें, शिवाय सामाजिक कार्यांत भाग घेणें, मास्तरीण, शिपीण, नर्स (आजाऱ्याची सुश्रुषा करणें) इत्यादि सर्व कामांचा भार तिजवरच असतो.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(६) हल्लींच्या गृहिणींना पूर्वीवत सर्व कामें तर असतातच पण त्याशिवाय खर्च वाचविण्यासाठी म्हणून दुसरीहीं कित्येक कामें करावीं लागतात. उदाहरण, घरांतील टेबलें खुर्च्या वगैरे सामानांना वारनिश किंवा रंग देणें हेंही तिचेंच एक काम.

(७) मुलांचे रक्षण करणें, त्यांजवर प्रेम करणें, त्यांना सर्व प्रकारचें सहाय्य करणें, हेंही तिचें नेहमीचें काम. आपल्याला गृहिणी यादृष्टीने काय अधिकार प्राप्त होईल, किंवा आपल्यावर काय जबाबदारी पडेल या संबंधीच्या वाळपणीच्या तिच्या कल्पना खोटया ठरतात हें खरें, तथापि त्यांतसुद्धां कर्तृत्व आणि यश या पासून होणारें समाधान, हें तिच्या श्रमाचें उत्कृष्ट-पारितोपिक असतें यांत शंका नाहीं.

(८) नित्याचीं सर्व कामें करूनही तिला कुत्र्या मांजरावर लोभ करण्याला तिला फुरसद सांपडतेच. 'आत्मवत् सर्व भूतानी' या नियमाचें व्यवहारांत प्रत्यक्ष आचरण तिच्या ठायीं दिसतें.

(९) तिला तिच्या पतीप्रमाणे वर्तमानपत्र वाचण्याला फुरसद नसते हें खरें; तथापि आईच्या किंवा आजीच्या काळापेक्षां हल्लीच्या काळांत ती थोडें तरी अधिक वाचते, आणि जगांतील अनेक प्रकारचें वृत्त तिला माहित असतें. तिला तें माहित असावेंच लागतें, कारण तिच्या व्यवसायाचाच तो एक भाग आहे.

(१०) तिच्या पतीला ज्याप्रमाणें जगांतील अनेक गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें, त्याचप्रमाणें तिला सुद्धां किंचित् प्रमाणांत लक्ष द्यावें लागतें, व त्या साठी कसा तरी वेळांतवेळ काढून कांहीं पुस्तकें ती वाचतेच. त्याशिवाय पुरातन वस्तु दर्शन किंवा विंडो शॉपींग यांत तिला थोडासा वेळ खर्च करावा लागतोच.

(११) तिच्या सुखाच्या काळांतसुद्धां तिला थोडेसें दुःख किंवा निदान थोडीशी अस्वस्थता भोगावी लागते; मधून मधून तिला थोडासा पश्चातापहि वाटतो. तिला वाटतें, मी आपलें शिक्षण अर्धवट सोडलें तें शेवटपर्यंत न्यावयाला पाहिजे होतें; किंवा आपण गायन-वादनाचा अभ्यास केला नाहीं. पण तसें असलें तरी तिला तसांतसुद्धां दुःखांत सुख असतें; जो गायन वादनाचा अभ्यास तिला करतां आला नाहीं, तो आतां तिचीं मुलें करतात; यांतच तिला समाधान असतें.

(१२) तिचें काम म्हणजे मजुरी हें जरी खरें असलें, आणि तिला होणारें सुख खरोखर तिला नसून, दुसऱ्याला सुख तेंच आपल्याला सुख अशा दृष्टीने असतें, तरी त्या आक्षेपाचें खंडन आपोआपच निःशब्द स्वरूपाचें असतें. आपल्या मुलांची सेवा करतांना तें सुख तिला आपोआपच मिळतें.

(१३) मुलांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणें हेंच गृहिणीचें सर्वात मोठें आणि महत्वाचें कार्य, मुलें कधीं कधीं प्रश्न विचारतात, माझी प्रार्थना देव ऐकतो काय ? त्याचें उत्तर शब्दाने देणें कठीण आहे. पण तें उत्तर ती कृतीने देते. ती उत्कृष्ठ उदाहरण घालून देते. दर दहा स्त्रियांपैकी निदान आठ तरी नियमाने प्रार्थना -मंदीरांत जाणाऱ्या असतात. राष्ट्राची ईश्वरावर जर श्रद्धा असेल तर तिला मुख्य कारण देशांतील गृहिणी.

(१४) आठवड्याच्या शेवटीं, या आठवड्यांत आपण काय केलें असा प्रश्न उभा राहतो, आणि त्याचें उत्तर देणें फार कठीण असतें. बाजार करण्यांत अडीच तास खर्च झाले, साडेदहा तास स्वयंपाकांत खर्च झाले, पाउणे दोन तास वारखयासारख्या कामांत खर्च झाले, असा हिशोब करावा लागतो; आणि इतका हिशोब करूनही सर्व आठवड्याचा हिशोब देतां येत नाहीं. मुख्य काम म्हणजे खर्चाची तोंड मिळवणी करणें; हें तर तिला एकटीला करतां येतच नाहीं; यासाठी तें काम पतिपत्नी दोघांनी मिळून करावें लागतें.

(१५) प्रत्येक दिवशीचे शेवटचे काम सर्वात अधिक महत्वाचें असतें. वेणीफणी करून स्वतःचे सौंदर्य सजविणें हें मुख्य काम. विवाहापूर्वी आपल्या सौंदर्याच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बळावर तिनें भावी पतीचें मन आकर्षण केलें; परंतु तें मत आपल्याठिकाणी तसेंच आकर्षित राहवें ही आतां तिची आकांक्षा, आणि त्यासाठी तिला बरेच श्रमही करावे लागतात; पण त्याचे तिला कष्ट वाटत नाही.

(१६) आतां रात्रीची वेळ; घरांत शांतता, आणि घरांतील मंडळीचें एकमेकावरील प्रेम, यामुळें सर्व आनंदात आहेत. मुलें माडीवर निजलेलीं आहेत; कांही शेजारी मित्र शांततेची वेळ पाहून भेटीला आलेले आहेत. बोलावयाला हीच वेळ सोयीची. संभाषणें चालूं असतां गृहिणीच्या मनांत मात्र दुसरेच कांहीतरी विचार येतात. ती स्वगत म्हणते, मी पडद्यांचे कांठ शिवावयाचे विसरलेंच, तथापि इस्त्रीचें काम संपलें हें एक बरें झालें! मी पक्वान्नाची कृति (रेसिपी) कोठें ठेवली तें मला आठवत नाही. पुढच्या सणासाठी सामुग्री घेऊन ठेवली पाहिजे. जानीला पुढच्या आठवड्यांत दंत-वैद्याकडे न्यावयाचें आहे. मुलांच्या खोलीत हिरव्या-रंगाच्या चादरी कशा दिसतील? महत्वाचीं काय काय कामें उरकलीं आणि काय काय उरलीं याचा ती मनांतल्या मनांत आढावा घेत आहे. आपल्या पतीच्या मुखाकडे तिची दृष्टि वळते. त्याच्या चेहऱ्यावर स्मित हास्याची छटा दिसते. भेटीला आलेल्या लोकांना नुसते हास्य दिसतें, पण तिला त्या हास्यांत महत्वाचा गर्भितार्थ दिसतो. तो स्मित—हास्य रूपानें तिचे आभार मानतो; किंवा त्या स्मित—हास्याचा असाही अर्थ करतां येईल कीं, तूं स्वैंपाकघरांतील सर्व कार्याचा भार स्वीकारल्यामुळेंच मला वर्तमानपत्र वाचण्याला तरी सवड मिळाली. त्याच्या मनांतील सर्वांत महत्वाचा विचार हाच असेल कीं विवाहाचे वेळी तूं जी नववधू होतीस ती तशीच माझे दृष्टीने अजून आहेस. आणि कोणाही पतिनिष्ठ पत्नीला शाब्दिक आभार 'थँक्यु' असे नकोच असतात. त्याचें स्मित—हास्य हेंच अधिक गोड असतें.

(Coronet मधील लेखाच्या आधारें)

बाजारांतून गरजे प्रमाणें काय विकत घ्यावयाचें असेल तें विकत आणणें, हें अमेरिकन बायकांचे एक मुख्य कार्य असतें. पण पुष्कळदां दुकानांत जाऊन विकत घेण्यापेक्षां, दुकानाबाहेर उभें राहून बाहेरूनच निरनिराळ्या वस्तु पाहणें, यांतच पुष्कळसा वेळ खर्च होतो. प्रत्येक दुकानांत सडकेच्या बाजूला एक मोठें तावदान असून त्या मागें आंतल्याबाजूला दुकानदार निरनिळ्या वस्तूंचें प्रदर्शन करतो. अमेरिकेंत सर्वत्र अशा प्रकारचीं दुकानें असतात. त्यात निरनिराळ्या मालांचे प्रदर्शन असतें. आम्ही एकदां एका जवाहिराच्या दुकानांत कोहिनूर हिरा (कांचेची नक्कल) पाहिला. पुष्कळ लोक अशा रीतीनेंही प्रदर्शनें पहाण्यांत आपला वेळ खर्च करतात; यालाच विंडोशॉपींग म्हणतात. विंडोशॉपिंग शद्बाचा अर्थ, दुकानांत न जातां दुकानाबाहेर उभे राहून कांचेतून दुकानांतील मालाचें प्रदर्शन पाहणें. आतां जून महिना जवळ आला आहे या देशांत जून महिन्यांत विवाह पुष्कळसे होतात. त्यासाठी स्त्रियांच्या आकाराच्या तेवढ्याच मोठमोठ्या बाहुल्या निरनिराळ्या पोषाकानें नटविलेल्या ठेवलेल्या असतात. व त्या पाहण्याला पुष्कळ लोकांची गर्दी असते, डिसेम्बर महिन्यात ख्रिस्ट्मस मध्यें अशींच प्रदर्शनें असतात. सप्टेम्बर महिन्यांत शाळांत नवें वर्ष सुरू होतें, त्यावेळी पुस्तकें पाटचा, नोट बुकें पेन्सिली, इत्यादि शालोपयोगी वस्तूंचे प्रदर्शन असते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयीन स्फुटें : स्वरूप व कार्य

* * * * * * * **लेखक – भ. प्र. मोहरीर**

मराठी साहित्याच्या आजतागायत सर्व वाङ्मयप्रकारांचा परामर्ष साहित्यविवेचकांनी थोडाफार घेतलेला आहे. काव्य कादंबरी, नाटय, लघुकथा या ललितवाङ्मयांतील विशेष लोकप्रिय वाङ्मयप्रकरांचें तंत्र कसें व कोणतें आहे याचीहि चिकित्सा ज्येष्ठ व श्रेष्ठ टीकाकारांनी अनेक प्रसंगीं केलेली आहे.या टीकानिर्मितीमुळे या भिन्न भिन्न वाङ्मयप्रकाराचीं व्यवच्छेदक लक्षणें स्पष्ट झालेलीं असून वाङ्मयाच्या प्रत्यहीं होणाऱ्या वाढीला तीं मोठ्या प्रमाणांत सहायक झालेलीं आहेत. मराठी कविता व लघुकथा या उत्क्रान्ति–अवस्थेंत असलेल्या दोन लोकप्रिय वाङ्मयप्रकारासंबंधी अलीकडे प्रकाशांत येणारी टीका थोडीथोडकी नाही. त्यामुळे ललितसाहित्याच्या मूल्यमापनांत उत्तरोत्तर निर्दोषपणा येत आहे. मराठींतील या सर्वमान्य वाङ्मयप्रकारांचें तंत्रविषयक प्रयोग चालू असतांना मराठी टीका वाङ्मयाच्या आघाडीवर मात्र सामसूम आढळते. मराठी टीकावाङ्मयाबद्दल जेथें अनास्था आहे तेथे 'मराठी भाषेचें लेणें' म्हणून केसरी–पत्राने गौरविलेल्या 'वाङ्मयीन स्फुटें' या टीकावाङ्मयाच्या एका प्रकाराबद्दल तर बोलायलाच नको !

वृत्तपत्रांत व नियतकालिकांत होणाऱ्या तुरळक उल्लेखांव्यतिरिक्त या प्रभावी वाङ्मयप्रकाराचा परामर्ष अद्याप फारसा घेण्यांत आला नाही. डॉ. वा.भा. पाठक यांनी 'टीका आणि टीकाकार' या विद्वन्मान्य प्रबंधांत वाङ्मयीन स्फुटांचा स्वतंत्र निर्देश केलेला नाही. नियतकालिकांतील सर्वसामान्य ग्रंथांवरील टीकेपेक्षा स्फुटांचें स्वरूप मुळांतच भिन्न आहे. त्यामुळे नियतकालिकांत प्रसिद्ध होणाऱ्या टीकांत त्यांचा समावेश करणें औचित्याला धरून आहे असें वाटत नाही. 'टीका आणि टीकाकार' या टीकाविषयाला वाहिलेल्या प्रबंधांत वाङ्मयीन स्फुटांचा नामोल्लेख करून का होईना डॉ. पाठकांनी दखल घेऊं नये याबद्दल आश्चर्य व्यक्त करावेसें वाटतें. वाङ्मयीन स्फुटांची प्रवृत्ति सर्वथैव स्वतंत्र आहे असें मराठी टीकाकारांकडून फारसें मानण्यांत किंवा मांडण्यांत आलेलें नाही. 'टीका' या लहानग्या निबंधांत प्रभाकर माचवे यांनी वाङ्मयीन स्फुटांना 'वर्तमानपत्री टीका' म्हणून उल्लेखिलेलें आहे. त्यामुळे वर्तमानपत्री टीकेचे गुणदोष या अभिनव वाङ्मयप्रकाराला चिकटविण्याची गल्लत त्यांच्याकडून झालेली आहे. प्रभाकर माचवे यांनी 'टीका' या वाङ्मयप्रकाराचे दोन विभाग स्वतंत्रपणे कल्पिलेले असून शास्त्रीय, ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ टीकेच्या सदरांत वाङ्मयीन स्फुटांचाहि समावेश केलेला आहे. वाङ्मयीन स्फुटांचें मौलिक स्वरूप ओळखून तसा त्यासंबंधी उल्लेख डॉ. वि भि. कोलते यांनी गोंदिया येथील आपल्या अध्यक्षीय भाषणांतून प्रथमतः केलेला आहे. टीकावाङ्मयांत वाङ्मयीन स्फुटांनी बजावलेली कामगिरी लक्षांत घेतां त्यांच्या स्वरूपाचा व तंत्राचा आढावा घेणें क्रमप्राप्त ठरतें.

मराठी टीकेचा प्रपंच

पहिल्या पिढींतील मराठी टीकाकारांनी टीकावाङ्मयाचा भारदस्तपणा व बोज उत्तम राखला. वाङ्मयीन जागृतीचीं लक्षणें आरंभीं टीकावाङ्मयांतून गोचर झालीं. जनतेमधून बौद्धिक जिज्ञासा वाढविण्याचें व उच्च प्रतीची अभिरुचि घडविण्याचें कार्य टीकावाङ्मयाने पार पाडलें हें नाकबूल करतां यावयाचें नाही. ललितवाङ्मयाविषयीं आज आढळून येणारा ओतप्रोत जिव्हाळा टीकावाङ्मयामुळे सुसाध्य झाला असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. अव्वल इंग्रजींतील विचाराग्रणी व आघाडीवरील लेखक हे वाङ्मयाचें उत्तम अभ्यासक व मर्मज्ञ टीकाकार होते. पाश्चात्य वाङ्मयांतील उत्तमोत्तम कलाकृतींच्या गाढ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अध्ययनाची ग्वाही त्यांच्या वाङ्मयीनच नव्हे तर राजकीय व सामाजिक निबंधलेखनांतून पानापानावर आढळते. चौकस व सहृदय व्यासंगामुळे त्यांच्या लिखाणांत विद्वत्तासुलभ गांभीर्याबरोबर मूलग्राही सौंदर्यान्वेषणहि प्रतीत होते. कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या टीकालेखांतून रसिकतेचा सौरभ दरवळत आहे. 'रागिणी' 'तोतयाचें बंड' इत्यादि टीकालेख लिहून त्यांनी मराठी वाङ्मयाला कायमचे उपकृत करून ठेवले आहे. कै. तात्यासाहेब केळकरांचा पिंड तर तत्वजिज्ञासु टीकाकाराचा होता. त्यांच्या टीकालेखनांतून बौद्धिक व तात्विक कलाविलास वैपुल्याने आढळतो. श्री. बा. अ. भिडे यांचीही कामगिरी उल्लेखनीय आहे. प्रो. वा. म. जोशी यांची परीक्षणें गुणपूर्ण आहेत. पण टीकावाङ्मयांत अशी पहिल्या दर्जाचीं परीक्षणें 'उंबराच्या फुलासारखीं दुर्मिळ' असतात, हें कांही खोटें नाही.

टीकावाङ्मयांत तार्किक व तांत्रिक भागाचें अवास्तव स्तोम माजविण्यांत आल्यामुळे कलात्मकतेची गळचेपी झालेली आहे. कलेचें आत्मिक व मूलभूत सौंदर्य विशद करणाऱ्या कलाप्रेमी टीकाकारांनी कधी कधी मराठी टीकेची या कोंडींतून सुटका केलेली आहे हेंहि खरें आहे. ग. त्र्यं. माडखोलकर, पु. य. देशपांडे, के. ना. काळे, वि. ह. कुळकर्णी, श्री. ना. बनहट्टी, रा. श्री. जोग, के. ना. वाटवे, प्रभाकर पाध्ये व अनंत काणेकर यांच्या टीकालेखनामुळे मराठी टीकेचें वाङ्मयीन मूल्य उंचावलें आहे. अलीकडे मराठी साहित्यांत नवप्रवृत्तींचा आविष्कार होऊं लागल्यामुळे त्याचे पडसाद टीकावाङ्मयावरहि उमटलेले आहेत; व त्यामुळे टीकेचें समीक्षासौंदर्यहि वाढलें आहे. नवप्रवृत्तींवरील टीका ही टीकावाङ्मयाच्या विकासाला व पर्यायाने वाङ्मयाभिवृद्धीला उपकारक ठरली आहे.

आज मराठींतील टीकावाङ्मय रहस्योद्ग्राही, विमर्षात्मक, आणि मूलग्राही स्वरूपाचें असून पाश्चात्य टीकावाङ्मयाचें गुण त्यांत प्रतीत झाले आहेत. सौंदर्यशास्त्राचा मूलगामी अभ्यास व वाङ्मयीन मूल्यांचें सखोल अध्ययन यामुळे आजचें मराठी टीकावाङ्मय सखोल व संपन्न झालेलें आहे. श्री. बा. सी. मर्ढेकर, पु. मं. लाड, श्री के. क्षीरसागर, दि. के. बेडेकर, सौ. कुसुमावती देशपांडे यांचें टीकालेख वाचल्यास माझ्या म्हणण्याचा प्रत्यय येईल. तसेंच वा. ल. कुळकर्णी, मं. वि. राजाध्यक्ष, भ. श्री. पंडित, रा. शं. वाळिंबे, डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, डॉ. मा. गो. देशमुख इत्यादि टीकाकारांचें लेखन अभ्यासिल्यास टीकावाङ्मयाची प्रगति अवलोकनांत आल्याशिवाय राहणार नाही.

'शालेय' टीका पद्धति

मराठींतील प्रचलित टीकापद्धति ही शालेय (academic) व जुजबी स्वरूपाची असते असा डॉ. केतकरांचा अभिप्राय होता. ग्रंथाचीं केलेलीं टीकापरीक्षणें हीं बहुधा बहिरंगनिष्ठ असतात. परीक्षणाची चाकोरी व टीकेचीं मूल्यें यांत साचेबंदपणा आलेला असतो. त्यामुळे वाङ्मयीन टीका 'वेदाभ्यासजड' उथळ व प्रतिगामी होण्याचा बराच संभव असतो. मराठींतील उच्च दर्जाचें समीक्षणाचें कार्य बोटावर मोजण्याइतपत अल्पस्वल्प झालेलें आहे. मराठी टीका ही अभिप्रायाच्या व गुणदोषात्मक औपचारिक चर्चेच्या गर्तेत अडकून पडली होती. तिला प्रवाही, आत्मनिष्ठ व गतिमान बनविण्याचें कार्य वाङ्मयीन स्फुटांनी केलें. वाङ्मयीन टीका व स्फुट टीका या दोहोंत मूलभूत भेद आहे. पहिला टीकाकार तत्वाची व तपशीलाची साकल्याने माहिती देऊन त्याचें साधक बाधक विवरण करीत असतो. विविध ग्रंथकारांच्या मतांचा मागोवा घेऊन 'टीकाविषयी भूत' ग्रंथांतील खरेखोटेपणा पडताळून पहातो. त्यामधील आशय त्याला मान्य होतोच असें नाही. त्याच्या टीकेचा घाट 'विषयानुवर्ती' असतो. त्याच्या विचाराची दिशा ग्रंथाचा कौल घेऊन बदलत असते त्यामुळे लेखनपद्धतींत मर्यादितपणा व यंत्रबद्धपणा जाणवूं लागतो. स्फुटकार एखादी ग्रंथकृति आपल्या समोर 'निमित्तमात्र' ठेवतो. त्या ग्रंथाच्या अनुषंगाने तो इतर साहित्यकृतीचा दुवा सांधीत असतो. एखादी साहित्यकृति अथवा साहित्य केन्द्रबिन्दु कल्पून स्फुटकार वाङ्मयमंडळांत स्वैरपणे भ्रमण करीत असतो. मराठी टीकालेखन नाविन्यपूर्ण चमकदार करण्याचें बरेचसें श्रेय स्फुटकारांना द्यावें लागेल.

वाङ्मयीन स्फुटें तंत्र व मंत्र

अलीकडे नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयीन स्फुटांनी, त्यांना दर्जा मिळवून दिलेला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. चतुरस्त्रपणामुळे विविधता निर्माण करणारा, लालित्याने कलात्मक झालेला, व चुरचुरितपणामुळे आकर्षक झालेला हा अभिनव वाङ्मयीनप्रकार एकेकाळीं बराच गाजला होता व शिळाछाप व बाळबोध टीकेच्या वर्दळींतल्या वाङ्मय स्फुटांनी आपल्या मौलिक गुणांची चुणूक दाखविली होती. साहित्य, साहित्यिक व साहित्यविषयक प्रश्न याविषयींची निर्भीड टीका नियतकालिकांच्या रकान्यांतून अवतरूं लागली. ग्रंथपरीक्षणाचें कार्य समतोल, निःपक्षपाती, व गुणदोषचर्चात्मक होतें, व टीकाविषय असलेल्या ग्रंथापुरतें प्रायः मर्यादितहि असे. तें आतां आत्मनिष्ट झालें व ग्रंथनिरीक्षणाच्या निमित्ताने ते साहित्यसृष्टींत फेरफटका करूं लागले. निबंध व लघुनिबंध या दोहोंच्या रचनाविषयक वैशिष्ट्यांत जी तफावत आहे तीच चालू टीकापद्धतींत व वाङ्मयीन स्फुटात्मक टीकेंत आहे. वाङ्मयीन स्फुटांची मांडणी स्वैर स्वरूपाची असते. प्रतिपाद्य विषयावर सोपपत्तिक आणि सर्वांगीण टीका न करतां त्यांतील एखाद्या विचारस्फुल्लिंगावर भाष्य करण्यास टीकाकार उत्स्फूर्त होत असतो. विविध उदाहरणांचा व समर्थक श्रुतयोजनाचा आधार घेऊन. त्यांच्या कोंदणांत आपला युक्तिवाद खुलवीत असतो. वेगवेगळे वैचारिक पैलू प्रकाशांत आणून आपल्या बुद्धिप्रभावाने वाचकाला दिपवून सोडतो.

इंग्रजी नियतकालिकांतून वाङ्मयीन स्फुटें बरीच लोकप्रिय झालेलीं आहेत. साहित्याचा दर्जा वाढवावा या उद्देशानेहि तीं प्रसिद्ध करण्यांत येतात. Quarterly Review' 'JohnO' London Weekly'London Times Supplement', 'Perspectives' 'Thought'(India) 'Saturday Review'(America) या इंग्रजींतील प्रसिद्ध नियतकालिकांतून वाङ्मयीन स्फुटें नियमितपणे प्रसिद्ध होतात.

प्रतिभेच्या 'रामशास्त्रांनी' मराठी टीकावाङ्मयांत वाङ्मयीन स्फुटांचा पायंडा पाडला. त्यानंतर अनेक स्फुटकारांनी अनेक नियतकालिकांतून वेगवेगळीं टोपण नांवें धारण करून हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय करण्यास हातभार लावला आहे. आकाशवाणी – वायुपुत्र (संजीवनी) 'वादसंवाद' – 'निषाद आणि शमा' (अभिरुचि), 'शब्दवेधी'चें 'शरतांडव' (इन्किलाव) 'शारदेचें शरसन्धान' – 'द्रोणाचार्य' (नवयुग) 'वाङ्मयविहार – भाष्यकार (भवितव्य) 'उडतीं पानें' – शिशिर (समाधान) 'तटस्थाचें तरंग' (सुषमा) 'साहित्य व साहित्यिक' – रुद्रट (राष्ट्रशक्ति) हीं वाङ्मयीन स्फुटांची सुप्रसिद्ध व विशेष उल्लेखनीय उदाहरणें आहेत. विद्यमान वाङ्मयीन व वाङ्मयपर घडामोडी व प्रवृत्तींचा परामर्ष घेण्याच्या उद्देशाने अवतरलेल्या या वाङ्मयीन स्फुटांनी कित्येक प्रसंगीं साहित्यगोंडाची भंबेरीहि उडविली आहे व कांही प्रश्नांबद्दल कलात्मकतेनें व जिव्हाळयानें विचार करण्यासहि शिकविले आहे. या वाङ्मयीन स्फुटांनी रूढ टीकालेखनांतील औपचारिकपणा व गंभीरपणा टाकून देऊन त्यांत दिलखुलास मोकळेपणा निर्माण केला. साहित्य व साहित्यिक यांच्याकडे ठराविक दृष्टिकोणांतून पाहाणाऱ्या जडभरतांना त्यांनी मोकळया वातावरणांत आणून सोडले. मराठी साहित्याकडे आपुलकीच्या जाणिवेने पाहाणाऱ्या भाषाभगिनींच्या स्वरूपसौंदर्याची प्रचीति या स्फुटकारांनी आणून दिली. मोजक्या शब्दांत विशाल आशय सांगण्याचा यशस्वी प्रयत्न केला व कोणत्याहि वादग्रस्त प्रश्नाचा मूलगामी छडा लावण्याच्या इरेला न पडतां त्याचें विच्छेदन करण्याचा मोह त्यांनी आवरला. कधी तुलनात्मक पण सहृदय, सौम्य पण प्रांजळ असा पवित्रा स्फुटकारांनी घेतला, तर कधी शाब्दिक चमत्काराने व कलेच्या खोटया कल्पनांनी जनतेची दिशाभूल करणाऱ्या 'जिनगरी कलावंतांना' मागे खेचून न्यायनिष्ठुरताहि व्यक्त केली ! वाङ्मयीन स्फुटांतून गोवण्यांत आलेलीं मतें म्हणजे शब्दयुद्धांना दिलेलीं लहानमोठीं आव्हानेंच होत. जिव्हाळयाच्या साहित्यप्रश्नावर निर्भीडपणे समयानुकूल विचार मांडण्याची समयज्ञता स्फुटकाराच्या अंगी असते. कांही साहित्यप्रश्नाचें महत्व प्रासंगिक, तर कांही स्थायी स्वरूपाचें असतें. बहुश्रुतपणा, भाषेवर असामान्य प्रभुत्व, व प्रखर बुद्धिवाद या भांडवलावर जनतेचीं मनें त्याला आकृष्ट करतां येतात. स्फुटकार हा परंपरागत पण अनिष्ट साहित्यदंडकांच्या व लब्धप्रतिष्ठित साहित्यश्रेष्ठींचा दंभस्फोट करण्यांत वाकबगार असतो. प्रवाहपतिताप्रमाणे तो लिहीत नाही. तो नाणावलेल्या व्यक्तींची किंबहुना जनमताचीहि पर्वा करीत नाही. व्यक्तिपूजेची प्रथा दृढमूल झाल्यामुळे एखाद्या साहित्यिकाच्या कृतींतील गुणदोषांचा समतोल विचार करण्याची पात्रता समाजांतून लोप पावलेली असतें. स्फुटकार हा वाङ्मयक्षेत्रांतील एक बंडखोर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असतो. प्रतिगामी विचारप्रवाह अवरुद्ध करण्यांत तो आपल्या ठिकाणचें सारें वाङ्मयीन कौशल्य पणाला लावतो. श्रद्धावादाच्या व सांकेतिकतेच्या भ्रममूलक वातावरणांत वावरणाऱ्या जीर्णवाद्यांना तो मार्गदर्शन करीत असतो. त्याचे 'दुर्मतध्वंसनाचें' कार्य परमत-खंडनांतून, उपरोधांतून व निषेधांतून निर्माण झालेलें असतें.

'वर्तमानपत्री टीका'

वाङ्मयीन स्फुटटीकाही 'वर्तमानपत्री टीके'पेक्षां भिन्न असते हें निर्विवाद होय. प्रभाकर माचवे यांनी टीकेचें 'आत्मनिष्ठ' व 'वस्तुनिष्ठ' टीकेच्या सदरांत 'वर्तमानपत्री टीके'ला घातलेलें आहे. स्फुटें वर्तमानपत्री टीके'त मोडतात असें गृहित धरलें तरी श्री० माचवे यांनीं वर्तमानपत्री टीकेची जी लक्षणें दर्शविलेली आहेत तीं वाङ्मयीन स्फुटांना मात्र मुळीच लागूं होत नाहीत. वर्तमानपत्रांतून व नियतकालिकांत हरघडी प्रसिद्ध होणारी ग्रंथपरीक्षणें व समालोचनें यांचें स्वरूप श्री० माचवे यांनी म्हटल्याप्रमाणे 'वस्तुनिष्ठ' असते. ही टीका लेखकाच्या अंतरंगाचा विचार न करतां लेखनकृतीच्या बहिरंगावरच खिळलेली असते. या टीका म्हणजे वाङ्मयीन ठोकताळयांचा मेळ बसवून लिहिलेल्या असतात. वर्तमानपत्री टीकांतून यांत्रिकपणा व व्यवसायिकपणा यांच्या मर्यादा पडलेल्या असतात. पण वाङ्मयीन स्फुटाचें स्वरूप मात्र अगदी या उलट आहे. ऐतिहासिक टीकाकार आणि वर्तमानपत्री टीका-कारांत भेद दाखवीत असतांना 'ऐतिहासिक टीकाकार गंभीर स्वरूपाचा असतो व वर्तमानपत्री टीकाकार उथळ असतो' या श्री० माचवे यांनी केलेल्या विधानांत थोडें तथ्य आहे. पण 'वर्तमामानपत्री टीकाकारांत' 'प्रतिभे'च्या रामशास्त्र्यांचा व 'संजीवनींतील' 'वायु-पुत्राचा' उलेख करीत असतांना शेजवलकर, क्षीरसागर, खांडेकर यांचा उलेख वर्तमानपत्री टीकाकार म्हणून केलेला आहे. एवढेंच नव्हे तर प्रा. फडक्यांचा उल्लेख करून त्यांच्या 'साहित्य आणि संसाराला' 'वर्तमानपत्री टीके'च्या कक्षेत ओढलें आहे. या पेक्षांहि विशेष उल्लेखनीय म्हणजे प्रा. फडक्यांनी परदेशी भाषांतील उत्कृष्ट कादंबऱ्यांच्या कथानकांचा केलेला परिचय सुद्धा 'वर्तमानपत्री टीकेंत' खातरजमा केलेला आहे. श्री. माचवे यांनी उत्कृष्ठ टीकेसंबंधींची उदाहरणें दिलेली नाहीत. परंतु त्यांनी काढलेले उद्‌गार, स्फुट-लेखकांनी ध्यानांत घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात— 'असला टीकाकार कंपूशाहींत सामीलहि होत नाही व स्वतःचा कंपूहि निर्माण करीत नाही. तो कुणाचे चावेहि घेत नाही की कुणाला बोचकारेहि भरीत नाही. व त्याऐवजी स्वतःला चाववूनं किंवा ओरबाडून शद्वांनीच कां होईना घेत नाही. तो सद्सद्विवेक बुद्धीच्या आश्रयानें आपलीं प्रामाणिक मतें व्यक्त करतो' व्यक्तिद्वेषाने व मत्सरभावनेने मराठी टीका बरबटलेली आहे. तींत संयम व तोल हवा आहे. स्फुट-कारांना तर त्याची फार आवश्यकता आहे. स्फुटें लिहीत असतांना वरील विधान डोळयांसमोर ठेवलें तर वाङ्मयीन स्फुटांची निर्मिति अधिक लोकप्रिय व प्रत्ययपूर्ण होईल असें हमखास म्हणतां येईल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ना. रा. शेंडे
सर चिटणीस, वि. सा. संघ,
यांजकडून.

अध्यक्ष व सरचिटणीस यांच्या वि. सा. संघशाखांना भेटी

वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांनी, दि. १०–७–५४ रोजीं वर्धा, दि. १२–७–५४ रोजीं अमरावती आणि दि. २–८–५४ रोजी गोंदिया येथील संघशाखांना भेटी देऊन, तेथील प्रमुख कार्यकर्त्यांशी वि. सा. संघाच्या कार्याबद्दल सर्वस्पर्शी चर्चा केली. तसेंच त्यांनी आमगाव व बालाघाट येथील कांही कार्यकर्त्यांशी विचारविनिमय केला.

त्याचप्रमाणे, सरचिटणिसांनी दि. ११–७–५४ रोजीं भंडारा संघशाखेला भेट देऊन, तेथील प्रमुख कार्यकर्त्यांशी कार्याच्या प्रगतीबद्दल चर्चा केली.

श्री. राजा परांजपे यांची वि. सा. संघाला भेट

सुप्रसिद्ध चित्रपट–निर्माते, दिग्दर्शक व नट श्री. राजा परांजपे यांनी दि. २६–६–५४ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. नटवर्य श्री. सखारामपंत जोशी यांनी श्री. परांजपे यांचा मार्मिक शब्दांत परिचय करून दिल्यावर, श्री. राजा परांजपे यांचें मराठी चित्रपटाच्या व्यवसायाबद्दल सुंदर भाषण झालें. भाषणानंतर वि. सा. संघाला १०१ रु. ची देणगी देण्याची त्यांनी आपली मनीषा व्यक्त केली.

★ ★

सांस्कृतिक कार्यक्रम कौमुदी उत्सव

सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे कौमुदी उत्सवाचा तिसरा कार्यक्रम दि. २४–७–५४ रोजीं साजरा झाला. प्रथम कवि श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी 'माझ्या कांही कवितांची जन्मकथा' या विषयावर ओजस्वी भाषण दिलें. आपल्या कांही कवितांच्या निर्मितीची पार्श्वभूमि विशद करतांना त्यांनीकेलेलें कविता-वाचन मोठें सूचक होतें. त्यानंतर, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या 'मराठी कादंबरी' (भाग १ व २) या ग्रंथांवर मार्मिक चर्चा झाली. डॉ. मा. गो. देशमुख व प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांनी या चर्चेत भाग घेऊन ग्रंथांचें मूल्यमापन केलें.

या कौमुदी उत्सवाचा चौथा कार्यक्रम दि. १९–८–५४ रोजीं 'प्रेक्षकांच्या माध्यमांतून आलेले अनुभव' ह्या विषयान्वयें नाटककार, दिग्दर्शक, नट व अभिनेत्री ह्या नात्याने कांही कसलेल्या कलावंतांचीं अनुभवात्मक भाषणें झालीं. सौ. अनसूयाबाई वाडेगावकर, सौ. कुसुम खांडेकर, श्री. सखारामपंत जोशी, श्री. बाबूराव चिमोटे व श्री. मनोहरपंत परांजपे यांनी नाट्यसृष्टींतील आपले विविध अनुभव सांगून नाटककार, नट व प्रेक्षक यांच्या परस्पर संबंधावर प्रकाश टाकला.

या अभिनव उपक्रमाचा लगेच दुसरा कार्यक्रम दि. २३–८–५४ रोजीं तितकाच हृदयंगम व बोधप्रद झाला. श्री. वा. वा. भोळे व श्री. नानासाहेब जोग या सुप्रसिद्ध नाटककारांनी व दिग्दर्शकांनी नाटकें आणि रंगभूमिसंबंधी मोठी उद्बोधक माहिती दिली. तसेंच श्री. बापूसाहेब चोरघडे व सौ. कुसुम मोहनी यांनीहि आपले अनुभवाचे बोल सांगितले.

★ ★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. लोकमान्य टिळकांचें पुण्यस्मरण

दि. १–८–५४ रोजीं कै. लोकमान्य टिळक पुण्यतिथि–दिन मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं प्रथम वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर, डॉ. वि. भि. कोलते यांनी लोकमान्यांच्या वाङ्मयीन कार्याबद्दल, डॉ. शं. दा. पेंडसे यांनी त्यांच्या अध्यात्म्यावर अधिष्ठित व्यक्तित्वाबद्दल आणि श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी त्यांच्या खाजगी आदर्श जीवनाबद्दल अतिशय उद्बोधक माहिती सांगितली. त्यानंतर राज्यपालांनी लोकमान्यांच्या राजकीय कार्याचा मार्मिक आढावा घेऊन, " लोकमान्य टिळक हे भारताचे महान् द्रष्टे होते. राजकारण आणि धर्म यांचा समन्वय त्यांच्या जीवनांत झालेला दिसून येतो. त्यांचें जीवन पूर्णत्वास पोंचलें होतें. " अशा ठासीव शब्दांत लोकमान्यांची महति सांगितली. वंदे मातरम् हें राष्ट्रगीत होऊन ही भव्य स्मृतिसभा संपली.

भंडारा शाखेचा टिळक पुण्यतिथि–दिन

दि. १–८–५४ रोजीं भंडाराशाखा व सार्वजनिक वाचनालय यांचा जोड कार्यक्रम होऊन हा पुण्यतिथि–दिन श्री. ना. ग. वझे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

★ ★

गोंदियाशाखा वृत्त

कार्यकारी मंडळाची सभा

गोंदिया शाखेच्या कार्यकारी मंडळाची सभा दि. २६–७–५४ रोजीं होऊन, केन्द्रीय कार्यकारी मंडळाच्या एका रिकाम्या झालेल्या जागेवर गोंदिया शाखेतर्फे शाखाध्यक्ष श्रीमान् छोटुसाभाई क्षत्रीय यांना पाठविण्याचा ठराव मंजूर करण्यांत आला.

याच सभेंत, श्रीमान् छोटुसाभाई क्षत्रीय, शाखाध्यक्ष, गोंदिया यांचे काका श्रीमान् भिकुसासेठ सिन्नर यांच्या आकस्मिक निधनाबद्दल शोक व्यक्त करणारा ठरावहि मंजूर करण्यांत आला.

टिळक पुण्यतिथि–दिन आणि स्वाध्याय मंडळाची स्थापना

दि. १–८–५४ रोजीं वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांचे अध्यक्षतेखाली टिळक पुण्यतिथि दिन साजरा करण्यांत येऊन त्या प्रसंगीं स्वाध्याय मंडळाची करण्यांत आली.

★ ★

वर्धा येथे वि. सा. संघशाखेची स्थापना

दि. १४–८–५४ रोजीं वर्धा येथे न्यू इंग्लिश हायस्कूलचे सभागृहांत श्री. र. वि. करंदीकर यांचे अध्यक्षतेखाली सभासदांची सभा भरून. वि. सा. संघशाखा स्थापना करण्यांत आली. पदाधिकारीं खालीलप्रमाणें

अध्यक्ष : श्री. र. वि. करंदीकर

चिटणीस : श्री. ब. पं. तांदळे व सहचिटणीस श्री. ज. ल. पत्रे

सभासद : डॉ. शहा, प्रा. चांदूरकर, श्री. ह. म. क्षीरसागर आणि सौ. उषाबाई देशपांडे.

———

दप्तरी स्मृती ... विदर्भ साहित्य संघ ... ग्रंथालय

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाटचगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीनें दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन.

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रतिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें,

मराठी–प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ★ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. कुंडलराव मोहेकर यांनी अशोक मुद्रणालय, धर्मपेठ, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ह. ना. नेने, अध्यक्ष, वि. सा. संघ, यांनी संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ